# श्री साईलीला

## या अंकांत—


- शाश्वत सुखाचे वाटेकरी व्हा
- तुकोबांचा साह्यकारी विठोबा
- सिद्धीच्या मागें लागूं नका
- एकाग्रता कशी साधावी
- तुज शरणांगत मी देवा
- गरजवंताला अक्कल नसते
  नाम स्मरणाचें महत्त्व
- साईबाबांची शिकवण
- संत समागम गोड
- श्रीगुरुग्रंथांतील नामदेवांची वाणी
- संताचें स्वरूप व कामागिरी
- श्रीसाई शरणानंद यांचा अल्प परिचय


डिसेंबर १९६१ | किं. ५० न. पैं

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेची भांडी
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

नामाचा महिमा कुठवर गावा? आपण पापाचे कितीही डोंगर रचलेले असोत, नामाच्या सामर्थ्यामुळें त्यांचा चक्काचूर होऊन जातो. आपल्या या देहासभोंवार नाना बंधनें आहेत. त्यांच्यापायीं आपण जखडले गेलेले आहोंत; परंतु नाममहिमा असा परिणामकारक आहे कीं त्याच्यापुढें त्यांना हार खावी लागते. तीं बंधनें तटातट तुटून त्यांतून माणूस मोकळा होतो. तुमच्या मनांत दुष्ट व मत्सरी विचारांना थारा मिळणार नाहीं. नामाचें महात्म्य कुठवर गावें? नामामुळें प्रत्यक्ष काळाचीही मान मोडून जन्ममरणांच्या फेऱ्यांतून आपली सुटका होते. आपणास नामाची गोडी लागावी. ती प्रयत्नें करून जडवून घ्यावी. कारण आपल्या शाश्वत कल्याणाचा तो मार्ग आहे. तुम्हांला अंतःकरण शुद्धि साधावयाची आहे ना? मग नामासारखें दुसरें सुलभ साधन नाहीं. ज्याला परमार्थाची ओढ लागली आहे. त्याला पोषक नाम हेंच साधन आहे. त्याच्यासारखें आपल्या जिव्हेला दुसरें भूषण नाहीं. नामसंकीर्तनास स्नान करावें लागत नाहीं किंवा दुसरे कोणतेही विधि करायला नकोत. सर्व पापांचा नायनाट करणारें असें हें अत्यंत सुलभ साधन आहे, जो कोणी माझें नामसंकीर्तन सदा सर्वकाळ करील त्याचा बेडा पार झाला म्हणून समजावें. 'जया माझ्या नामाची घोकणी। झालीच तयाचे पापाची धुणी। तो मज गुणियाहुनि गुणी। जया गुणगुणी मन्नामीं॥' —श्रीसाईसच्चरित.


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४० वें ] डिसेंबर १९६१ [ अंक ९ वा

: संपादक :

गो. वि. क्षीरसागर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४

# प्रिय वाचक—

भक्ताला भगवंताची भेट झाल्याशिवाय रहात नाहीं. तो भक्त कसोटीला मात्र उतरला पाहिजे. ज्याची भक्ति निस्सीम आहे, ज्याला ध्यानींमनीं तेंच एकमेव चिंतन असतें, रागद्वेषादि त्या मार्गाआड येणारे शत्रू ज्यानें दूर पिटाळून लाविले आहेत व जो त्याला अनन्यभावें शरण जातो, त्याच्या भेटीसाठीं ज्याचा जीव व्याकुळ झाला आहे, अशा भक्ताला भगवंत भेटणार नाहीं तर मग दुसऱ्या कोणाला भेटणार ?

सांईबाबा तुमचे दैनंदिन खेळ पहात आहेत, तुमच्या आचरणावर त्यांचें पूर्ण लक्ष आहे, तुम्हीं जेव्हां त्यांचें अनन्यभावें स्मरण कराल, त्यांची कृपादृष्टि वळावी म्हणून परोपरीनें झटाल त्यावेळींच ते तुमच्याकडे वळतील, एरवीं नाहीं. बाबा अत्यंत दयाळू आहेत, तुम्हीं दुःखी कधीं होऊं नये, सुखासमाधानांत रहावें म्हणून तुमच्या संकटाच्या व अडीअडचणीच्या वेळीं ते धांऊन येतात व तुम्हांला संकटमुक्त करतात. परंतु एकदां का तुम्ही चिंतामुक्त झालां म्हणजे त्यांच्याकडे पाठ फिरवितां. पुन्हां त्यांचें नांव गांव कांही नाहीं. पुन्हां संकटें ओढवतात. व मग पुन्हां तुम्हीं त्यांच्याकडे धांव घेतां. आक्रंदन सुरू होतें. बाबांचें दयाळू अंतःकरण पुन्हां कळवळतें व पुन्हां पुन्हां ते तुमच्या सहाय्यार्थ धांवून येतात.

हा संसार व त्याला चिकटलेले व्यवहार असे कांहीं विचित्र आहेत कीं, त्यांचें मोहजाल तोडणें महाकठीण आहे. या क्षणभंगूर सुखोपभोगांत तल्लीन होऊन न रहातां तुम्हीं त्यांच्यातून निसटावें असें बाबांना का वाटतें ? तुमच्या शाश्वत कल्याणासाठीं. परंतु एकदां दोनदां नव्हे तर अनेकवार अद्दल घडली असतांही जी अक्कल यावयाची ती येत नाहीं. पुन्हां ये रे माझ्या मागल्या ! हें रहाटगाडगें सुरू होतें. नानाप्रकारें जागवूनही पुन्हां पुन्हां आमचें तेंच तें गीत सुरू असते. हें गीत आणि हें दळण संपायचें तरी कधीं ?

ह. भ. प. दासगणू महाराज यांच्या संसारी व व्यवहारी जीवनांतील एक घटना या अंकीं सादर करण्यांत आली आहे. ती कांहीं नवीन नाहीं. अनेकांस तिची माहिती असेल; तरीही तिची पुनरुक्ति करण्यांत आली आहे. चांगल्या गोष्टींची पुनरुक्ति नेहमीं होत रहावी. ती आपल्या कल्याणास कारणीभूत होत असते.

दासगणू महाराज हे आज संतपदाला पोहोंचले आहेत. त्यांची थोरवी आम्हीं पामरांनीं काय वर्णावी ? परंतु मनुष्य प्रथमावस्थेंत तुमच्या आमच्यासारखा सुखोपभोगी, संसार चिंतेनें व्यापलेला, पोळलेला व अगतिक झालेला असतो.

आणि शेवटीं धडपडत धडपडत त्याच स्थितींत त्याचा एके दिवशीं अंत होतो. पूर्व जन्मींचे संस्कार, पुण्याईचें गांठोडे व सद्भावनांची आणि सदाचाराची जोड त्याच्या वाट्यास आलेली असते त्याच्याच डोक्यांत या जन्मीं कधीं तरी प्रकाश पडतो. त्याचेंच जीवन उजाळलें जातें व त्याच्या जन्माचें कोट कल्याण होतें.

हें भाग्य सर्वांच्याच वाट्याला येत नाहीं. ज्यांच्या वाट्यास तें येतें ते खरोखर भाग्यवान् होत. दासगणू महाराज हे पोलिसखात्यांतील सरकारी नोकरींत गुरफटलेले तुमच्या आमच्यासारखे संसारांतील एक भारवाहक व कुटुंब पोषणाच्या काळजीनें व्यापलेले. आम्हीं सारे या एकाच माळेंतील लहान मोठें मणी आहोंत नाहीं का ?

दासगणू महाराजांच्या जन्माचें सार्थक होण्याचा समय नजिक येऊन ठेपलेला होता. का सत्पुरुषाशीं कर्मधर्मसंयोगानें त्यांची भेट झाली. त्यांच्या उदार व सच्छील ागणुकीचा मनावर परिणाम झाला व त्यांचा गुरुपदेश घेण्याची त्यांना बलवत्तर च्छा झाली. इच्छा तसें फळ. त्यांची इच्छा पूर्ण झाली परंतु केवळ गुरुपदेशानें का ार्य होत असतें ? त्यासाठीं तशाच त्यागाची जरूरी असते. त्या त्यागाची मागणी रून त्यांना शाश्वत कल्याणाचा मार्ग दाखविण्यासाठीं त्यांनीं त्यांची पाठवणी ाईबाबांकडे केली.

नंतरच्या काळांत या उभयतांचे जे संबंध घडून आले ते किती आपुलकीचे माचे व कमालीच्या सहनशीलतेचे होते ! मनुष्याच्या हातून कळत न कळत अपराध डत असतात. चुका होत असतात. मनुष्यमात्राकडून चुका नाहीं घडायच्या तर त्या कोणा-डून घडावयाच्या ? चुकतमाकत अडखळत व पडतझडत आम्ही आमचा मार्ग आक्रमण ावयाचा आहे. दासगणू महाराज तसाच आपला मार्ग आक्रमीत होते. बाबांना मधून धून भेटत होते. त्यांच्या कृपाप्रसादाची अपेक्षा बाळगीत होते; परंतु बाबा त्यांना ोकरीच्या बंधनांतून मोकळा होण्याचा व हरिभजनाकडे वळण्याचा आदेश देत होते. त महात्मे कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत आदेश देतात, परंतु ते झेलण्याची आपली यारी असली पाहिजे ना !

'नोकरी सोडून मोकळा हो' हें सांगणें सोपें आहे; परंतु संसाराच्या मायेंत व ा जाळ्यांत गुरफटलेल्याला त्यांतून बाहेर पडणें महाकठीण असतें. आपल्यावर नेक माणसें अवलंबून असतात, आपण आपल्यामागें नाना व्याप लावून तलेले असतात. देण्याघेण्याचे व्यवहार सवडीसवडीनें पूर्ण करावयाचे सतात. किती ? एक दोन नव्हे, अनेक व्यवधानें सांभाळावयाचीं सतात. तीं कोणाच्या गळ्यांत अडकवून मोकळें व्हावयाचें ? तीं ज्याचीं त्यानेंच भाळावयाचीं असतात. जवळ जवळ अशाच प्रकारच्या मोहजाळांत सांपडल्यामुळें ासगणू महाराजांस बाबांचा आदेश तडकाफडकीं झेलतां येत नव्हता.

ईश्वर तुमची पदोपदीं कसोटी पहात असतो. तुमच्यापुढें मोहाचें ताट वाढून ठेवलेलें असतें. तें पायांनीं दूर लोटून टाकतां येत नाहीं. आपण आपल्या मनांत भावी काळासंबंधानें नाना प्रकारचे आराखडे आखलेले असतात. माझी पगारवाढ झाली पाहिजे. मिळतो तो पगार संसारास पुरेसा नाहीं. मला आणखी वरची पायरी गांठावयाची आहे. त्यासाठीं आणखी एखादी परीक्षा दिली म्हणजे मला बढती मिळणार आहे आणि मग माझा संसार अधिक सुखाचा होणार आहे, हे सुखद व स्वाभाविक विचार कोणाच्या मनांत वावरत नाहीत? दासगणू महाराजांच्या जीवनांतील त्या आरंभ काळांत त्यांच्याही मनांत तशा प्रकारचे विचार घोळत असले तर त्यांत नवल का आहे?

परंतु नाही; दासगणू महाराज जीवन सार्थकीं लागावें, त्यांच्या जन्माचें सोनें व्हावें, त्यांची संतमालिकेंत गणना व्हावी अशी 'डिक्री' देवाच्या दरबारांतून सुटलेली होती. त्याला कोण काय करणार? दासगणू महाराज ठेचाळत होते; पडत झडत होते; परंतु पुन्हां पुन्हां बाबांकडे वळत होते. त्यांच्याठायीं त्यांची निष्ठा जाज्वल्य होती. बाबा करुणासागर. एकदां दोनदां सांगून दासगणू ऐकत नाहींत. म्हणून बाबा त्यांच्यावर कधीं रागावले नाहींत. त्यांची असहाय्यता त्यांना समजत का नव्हती? संकटें पुन्हां पुन्हां येत होतीं आणि बाबा त्यांचे पाठीराखे होऊन येणाऱ्या संकटांतून त्यांची पुन्हां पुन्हां मुक्तता करीत होते. कधीं राग नाहीं, रुसवा नाहीं. त्या आपल्या परमभक्ताचें प्रेम बाबांनीं ओळखलें होतें. त्या प्रेमाला ते भाळले गेले होते. मग त्यांना कां बरें अंतर देतील?

आणि मग भाग्याचा एक दिवस असा उजाडला कीं, त्या दिवशीं बाबांच्या इच्छेला मान देऊन दासगणूंनीं नोकरीवर लाथ मारिली ती कायमची. परंतु ती लाथ मारतांना सभोंवारच्या आप्त नातलगांनीं व हितसंबंधी लोकांनीं थोडा-थोडका का गहजब केला? त्यांनीं निर्धारपूर्वक टाकलेलें पाऊल मागें खेंचण्याचा थोडा का अट्टाहास करण्यांत आला? परंतु मानाची, वाढत्या पगाराची व कुटुंबपोषणास हातभार लावणाऱ्या नोकरीचे ऋणानुबंध तुटण्याची वेळच येऊन ठेपली होती त्याला कोण काय करणार?

पुराणकाळांतील भावभक्तीची व देवकृपा झाल्याची उदाहरणें आपल्यापुढें कितीतरी आहेत; परंतु हें आजच्या काळांतील चालते बोलतें व दृष्टीसमोर असलेलें उदाहरण घेण्यांत आलें याचें प्रमुख कारण तें तात्काळ मनाला पटण्यासारखें असतें.

ह. भ. प. दासगणू महाराजांवर भगवंताची कृपा झाली. त्या कृपेचें सुमधुर फळ त्यांना मिळालें. भगवत्कृपेच्या छायेखालीं तुम्हीं वावरूं लागतां, सर्वस्व त्याला अर्पण करून तन्मय होऊन जातां तेव्हां तुमची सर्व प्रकारची काळजी तोच वाहूं लागतो. दासगणू महाराजांकडून आजच्यासारख्या काळांत बाबांनीं केवढी मोठी व बहुमोलाची कामगिरी करवून घेतली आहे? पूर्व काळीं होऊन गेलेल्या संतांचा

# शाश्वत सुखाचे वाटेकरी व्हा

—एक भगवंताचा भक्त

मन शांत रहात नाहीं, तें सैरावैरा धांवत पळत असतें. एका जागीं स्थिर म्हणून रहात नाहीं. कसें स्थिर राहील? जोंपर्यंत तुमच्याठायीं भोगेच्छा जागी आहे तोंपर्यंत तुमच्या मागच्या यातायाती कमी होणार नाहींत. तुमचें लक्ष लागूं द्या. त्याचें भजन, त्याचें चिंतन करण्यांत गोडी वाटूं द्या. मग आस्ते आस्ते तुमचे भवबंध खिळखिळे होण्याच्या मार्गास लागल्याशिवाय रहणार नाहींत. भगवंताच्या नांवांत अशी जादू आहे कीं, त्यामुळें तुमच्या मनांतील रागद्वेषादि विकार आस्ते आस्ते नाहींसे होण्याच्या मार्गाला लागतात. तुमचें ममत्व त्याच्या चरणीं गुंतल्यानें, तुमचें लक्ष त्या चरणांकडे वळल्यानें इतर ठिकाणचें लक्ष कमी कमी होत जाईल व खरी गोडी तुम्हांला त्याच चिंतनांत वाटूं लागेल.

कोणताही भोग घ्या. त्यांत तुम्हांला पूर्णत्व सांपडणार नाहीं. ते अशाश्वत असतात. ते कधीं तरी नामशेष होणारे असतात. त्यांचा वियोग कधीं ना कधीं व्हावयाचाच. तुम्हीं जों जों भोगांची अधिकाधिक इच्छा करीत जाल तों तों तुमच्या मनाची स्थिती अधिकाधिक चलबिचल होत जाईल; मन अस्थिर होत जाईल. नवीं नवीं पापें तुमच्याकडून घडत जातील. तुम्हीं पापांचें डोंगर रचित जाल. नेहमीं सुखोपभोगांच्या प्राप्तीसाठीं धडपडणाऱ्याला सुखाचा लाभ कोठून होणार? त्याला शेवटपर्यंत दुःखांत व अशांततेंतच वावरावें लागत असतें.

---

परिचय व संत चरित्र कथन महिपती कवीकडून भगवंतानें पार पाडून घेतलें. संतांचा महिमा वर्णन करणें, तो गाणें व ऐकणें या साध्या गोष्टी नाहींत. मनुष्याच्या जीवनाला उजाळा येत असतो, त्याला उपरति होत असते व अंतर्मुख व्हावेसें वाटतें, तें संतचरित्र वाचनानें व श्रवणानें असें आहे संतचरित्रांचे महात्म्य; आणि तशाच प्रकारची बहुमोलाची व जिची फार जरुरी होती अशी आधुनिक काळांतील संतांचा परिचय करून देण्याची व त्याचें गायन करण्याची कामगिरी बाबांनीं ह. भ. प. दासगणू महाराज यांच्याकरवीं यशस्वीपणें पार पाडवून घेतली. त्या कामगिरीचें मोजमाप करतां येण्यासारखें नाहीं. ती अभूतपूर्ण नसली तरी अपरंपार, अत्यावश्यक व सर्वांना आनंद साम्राज्याचा लाभ घडवून देणारी आहे.

—संपादक

---

भोगानें व्यापलेल्या मनाची अवस्था काय वर्णावी ? त्याचें शेवटपर्यंत तेंच ध्यान व तेंच चिंतन. अखेरचा क्षण येऊन ठेपला तरीही तोच निदिध्यास ! त्याची सुटका मरणानें झाली तरी तेच विचार घेऊन पुन्हां जन्माला यायचें व पुन्हां पुन्हां त्याच जाळ्यांत अडकावयाचें.

मग याच जन्मीं भोगांना थोडें थोडें दूर लोटून भगवंताकडे कां बरें लक्ष वळवीत नाहीं ? तुमच्या मनानें एकदा घेतलें पाहिजे. भगवंताशिवाय माझा तरणोपाय नाहीं; तोच माझा त्राता, भ्राता व सर्व कांहीं. त्याच्यापुढें सारे सुखोपभोग व्यर्थ आहेत, मातीमोल आहेत, असें तुम्हांला वाटूं लागलें पाहिजे. असें वाटूं लागणें हेंच भाग्याचें व जीवनसार्थक्याचें लक्षण आहे. मग सुखोपभोग कीं भगवंताशीं तुम्हीं योग पत्करणार ? हें तुमचें तुम्हीं ठरवावयाचें आहे; व त्या मार्गानें पावलें टाकावयाचीं आहेत. एका मार्गांत आहे या जीवनाची विफलता म्हणजे मनुष्य जन्माला येऊन जन्म विफल, निर्फळ दवडण्याची शक्यता व दुसऱ्या मार्गांत आहे जीवनसफलता.

तुमचें जीवन सफल व्हावें, सुंदर व्हावें असें नाहीं वाटत तुम्हांला ? आयुष्य फार थोडें आहे. कधीं व कोणत्या खिंडींत मृत्यू गांठील हें सांगतां येणें कठीण आहे विचार करायला वेळ फार थोडा आहे. आपलें जीवन सफल व्हावें असें वाटतें न तुम्हांला ? मग भगवत्भक्तीचा मार्ग चोखाळून शाश्वत सुखाचे वांटेकरी व्हा.

---

## पुण्यवान् बेडूक

एकदां राम आणि लक्ष्मण पंपा सरोवरांत स्नान करण्यासाठीं गेले. त्या दरम्यान त्यांनीं आपापले बाण तीरावरील मातींत पुरून ठेविले. स्नान संपवून बाहेर आल्यानंतर लक्ष्मणानें आपला बाण बाहेर काढून हातांत घेतला; तेव्हां त्याचें टोंक त्याला रक्तानें माखलेलें दिसून आलें !

रामानें तें पहातांच तो म्हणाला, 'लक्ष्मणा ! तें रक्त पाहिलेंस ना ? कोणी तरी प्राणी त्या बाणाच्या टोंकानें जखमी झाला असावा !'

लक्ष्मणानें तावडतोब जमीन उकरून पाहिली. पहातों तों काय ? एक मोठा बेडूक रक्तबंबाळ झालेला होता ! आणि तो मृत्युपंथाला लागलेला होता.

राम कळवळला. म्हणाला, 'अरे ! तूं डरांव डरांव ओरडला कां नाहींस ? आम्ही तुला वांचविण्याचा जरूर प्रयत्न केला असता. सर्पानें झडप घातली किंवा असाच कांहीं प्रसंग ओढवला असतां तूं आरडाओरड केल्याशिवाय नाहीं रहाणार ! '

'होय ! खरें आहे आपलें म्हणणें ! सर्पानें किंवा किंवा दुसऱ्या कोणींही हल्ला केला असतां मी आरडाओरड करतों. रामा ! मला वांचव, रामा, मला वांचव; असा मी धांवा करतों; परंतु प्रत्यक्ष राम किंवा रामाचा भाऊ मला मारूं लागला तर मी कोणाचा आणि कशाला म्हणून धांवा करूं ! आणि म्हणून मी स्वस्थ राहिलों ! '

---

# तुकोबांचा सहाय्यकारी विठोबा

— अनंत वासुदेव मराठे

**तुकोबावर नाना प्रकारचीं संकटें आलीं आणि विठोबाच्या कृपेनें तीं आलीं तशीं निघून गेलीं. भगवंताला आपल्या भक्ताची काळजी. तुकोबाच्या आयुष्यांतील कांहीं संकट प्रसंग लेखकानें येथें कथन केले आहेत —**

तुकाराम बुवांच्या चरित्रांत त्यांच्या छळाच्या गोष्टी जशा प्रसिद्ध आहेत तशाच त्यांनीं केलेल्या चमत्कारांच्याही पुष्कळ गोष्टी प्रसिद्ध आहेत. नामदेवांच्या दृष्टान्तानुरूप तुकारामबुवा कवित्व करूं लागले. हें त्यांचें कवित्व सारें अभंगरूपच असे. त्या अभंगांत वेदांतील तत्त्वज्ञान ओतप्रोत भरलेलें असे, पण त्या वेळेच्या कित्येक ब्राह्मणांची अशी समजूत असे कीं वेद म्हणण्याचा अगर त्यांचा अर्थ सांगण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच. इतरांनीं वेदाक्षरें ऐकणेंही पाप ! आणि तुकाराम तर उघडपणें सांगे कीं —

**रामेश्वर भट**

'आम्हीं वेदांचे बाप होऊन राहिलों आहों !' तेव्हां अशा त्यांच्या मतें 'नास्तिक' आणि 'भ्रष्ट' इसमाचा छळ करण्यास त्यांनीं प्रवृत्त व्हावें यांत आश्चर्य कसलें ? रामेश्वर भट्ट हा त्या छळकांत अग्रगण्य होता. त्यानें इतरांना आपल्या बरोबर घेऊन तुकारामाला गांठलें आणि त्याला सांगितलें कीं 'तूं शूद्र असल्यामुळें, तुला कवित्व करण्याचा अधिकार नाहीं.'

तुकाराम म्हणाला 'मी कवित्व करतों हें म्हणणेंच खरें नव्हे.'

आपुलिया बळें नाहीं मी बोलत । सखा भगवंत वाचा त्याची ॥
साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी । शिकविता धणी वेगळाची ॥
काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥
तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा । वागवी पांगुळा पायांवीण ॥

पण रामेश्वरभट्टासारखे लोक असल्या बोलण्याला ऐकतात ? ते म्हणाले 'तें कांहीं नाहीं. तूं हा अधर्म चालविला आहेस. तो ताबडतोब बंद कर आणि आतांपर्यंत जे अभंग केले आहेस ते इंद्रायणींत नेऊन बुडव !'

**अभंगांस जलसमाधी**

तुकोबांनीं त्यांची ही आज्ञा मान्य केली. मोठ्या कष्टानें त्यांनीं घरच्या अभंगाच्या सर्व वह्या जमा केल्या आणि सर्वांच्या देखत नेऊन इंद्रायणींत बुडविल्या ! रामेश्वर-

भट्टानें समाधान झालें आणि तो निघून गेला. पण तुकारामाला चैन पडेना. त्यानें अन्नपाणी वर्ज्य केलें. आपण कवित्व करतों हें खरोखरच देवाला नापसंत आहे काय याचा पुरा निकाल करून घेतला पाहिजे असा त्यानें निर्धार केला. नामदेवानें स्वप्नांत येऊन कवित्व कर म्हणून सांगितलें, आपणही आतांपर्यंत भागवत धर्मांचा संदेश सगळ्या जगाला कळवावा म्हणून ईश्वरानें मला जन्माला घातला आहे असें समजत आलों. आणि आतां हे लोक माझ्या अभंगांवर घाला घालून मला बोलूंही देत नाहींत हें काय ? परमेश्वराला हें कसें पाहवतें ? का त्याचीच इच्छा मी कवित्व करूं नये अशी आहे ? तेव्हां याचा एकदां पुरा सोक्षमोक्ष लावलाच पाहिजे म्हणून तो देवाच्या दारांत धरणें धरून बसला ! अन्न नाहीं पाणी नाहीं; झोंप नाहीं, देहधर्म नाहीं; 'देवा काय तें मला खरें सांग तोंपर्यंत इथून हालणार नाहीं' असा त्याचा निश्चय झाला होता.

"तुका म्हणे आतां न धरवे धीर । नव्हे जीव स्थिर माझा मज ॥
नाहीं आईकत तुम्ही माझे बोल । कासया हें फोल उपणूं भूस ॥
येसी तें करीन बैसलीया ठाया । तूंचि बुझवाया जवळी देवा ॥
करावे ते केले सकळ उपाय । आतां पाहों काय अझुनी वाट ॥
तुका म्हणे आला आंजेसी सेवट । होऊनीयां नीट पायां पडों ॥ १ ॥

अशा प्रकारें तेरा दिवस गेले. तेव्हां शेवटीं तुकारामाला स्वप्नांत दृष्टांत झाला कीं, "कवित्व कोरडें आहे, घेऊन ये."

**वह्या पाण्यावर तरंगल्या**

तुकाराम जागा होऊन इंद्रायणीवर गेला. पाहतो तों साऱ्या वह्या पाण्यावर तरंगत आहेत ! हा चमत्कार पाहण्याला सारा गांव लोटला. तुकारामानें आंत जाऊन त्या वह्या काढून घेतल्या आणि साऱ्या लोकांनी जयजयकार करून त्याची मिरवणूक काढली.

तेरा दिवस पाण्यांत राहिलेल्या वह्या कोरड्या कशा राहिल्या याचा साऱ्यांना अचंबा वाटला. तुकारामाची भक्ति पाहून श्रीविठ्ठलानेंच त्या कोरड्या ठेविल्या होत्या असें जो तो म्हणूं लागला. आणि तुकाराम सामान्य मनुष्य नसून प्रत्यक्ष परमेश्वर त्याचा पाठीराखा आहे अशी सर्वांची खात्री झाली.

दुसरीही अशीच एक मजेदार गोष्ट आहे.

एकदां तुकारामबुवांच्या गांवचा एक शेतकरी कांहीं कामासाठीं बाहेरगांवी जाणार होता. त्याला आपलें शेत राखण्यासाठीं कोणीतरी माणूस पाहिजे होता. तुकाराम नेहमीं रिकामा फिरतो, कुठेंतरी टाळ कुटीत बसतो, तेव्हां त्यालाच हें काम सांगितलें तर थोडक्यांत होईल असें वाटून एक दिवस तुकाराम एका

झाडाखालीं भजन करीत होता तिथें त्याच्याजवळ शेतकऱ्यानें ही गोष्ट काढली. तुकारामालाही वाटलें हें काम बरें आहे. तेव्हां दोघांचा करार ठरला की तुकारामानें शेत पिकून तयार होईपर्यंत त्याची राखण करावी आणि त्याबद्दल अर्धा मण धान्य शेतकऱ्यानें त्याला द्यावें.

तुकाराम ठरल्याप्रमाणें त्या शेतावरच्या माळ्यावर जाऊन बसला आणि शेतकरी बाहेर गांवीं निघून गेला. पांखरें येतील तर हांकण्यासाठीं गोफण वगैरे साहित्य त्या माळ्यावर तयार होतें पण तुकोबानें जेव्हां पाहिलें कीं पक्ष्यांचा थवा येऊन कणसांवर बसला आहे तेव्हां हे बिचारे भुकेलेले जीव, यांना हुसकून लावलें तर देवाच्या घरीं तो केवढा अन्याय होईल असें वाटून त्यानें तिकडे लक्षच दिलें नाहीं!

## जिजाईची काळजी

इकडे तुकोबा घरीं आले नाहींत म्हणून घरचीं माणसें काळजींत पडलीं. जीजाईनें खूप चौकशी केली तेव्हां ही स्वारी शेतांत शेताची राखण करीत आहे आणि पक्षी खुशाल दाणे खाऊन फडशा पाडीत आहेत असें तिला आढळलें! पण ती तरी काय करणार? शिवाय शेत कापणीनंतर अर्धा मण धान्य मिळण्याचा करार होता. तेव्हां तेवढे तरी दाणे पदरांत पडतील अशी तिला आशा वाटली आणि तुकाराम घरीं येत नाहीं असें पाहून तिनें नित्य त्याचें जेवण त्या शेतांतच पाठवून देण्याचें ठरविलें.

झालें, तुकारामाला ही योजना पसंत पडली. उगाच घरीं जा ये कशाला करा, त्यापेक्षां इथेंच राहणें बरें असें ठरवून तो नित्य पहांटे उठून स्नान करी, पांडुरंगाची पूजा करी आणि परस्पर शेतावर जाऊन भजन करीत बसे. पक्षीहि दररोज त्या शेतावर येऊन यथेच्छ लूट करीत. तुकाराम म्हणे, केवढी ही या पक्ष्यांची निर्लोभता! काय खावयाचें असेल तें इथेंच खातात. एक दाणाहि घरीं नेत नाहींत.

## असावें तर या पक्ष्यांसारखें!

अशा रीतीनें एक महिना गेला. शेतकरी परत येऊन पाहातो तों काय? धान्याचीं सगळीं ताटें उजाड होऊन गेलीं आहेत, आणि तुकाराम स्वस्थ 'पांडुरंग! पांडुरंग!' म्हणत भजन करीत बसला आहे! शेतकऱ्यानें रागारागानेंच तुकारामाचा हात धरून त्याला माळ्यावरून खालीं ओढलें आणि तो त्याला म्हणाला, 'तुझ्यावर विश्वास टाकून मी गांवीं गेलों; तो हा दावा बरा साधलास! आतां सरकारांत काय देऊं, बायका पोरांना काय घालूं आणि तुझ्या बोडक्यावर काय घालूं?' महाराज म्हणाले 'मीं काय केलें? शेत राखलें आणि पक्षांचीही राखण केली.' शेतकरी अधिकच क्रुद्ध झाला. गांवकरी जमले आणि सगळे न्यायनिवाडा करण्यासाठीं पंचायतीकडे गेले. शेतकऱ्यानें सांगितलें, 'याला शेत राखण्यासाठीं ठेवला होता. त्यानें

शेताची ही अशी दशा करून सोडली. आतां माझें धान्य त्याच्याकडून भरून मिळण्याची जर व्यवस्था होत नसेल तर मी गांव सोडून जातों.'

पाटील, कुळकर्णी काळजींत पडले. त्यांनीं शेतकऱ्याला विचारलें, 'तुझ्या शेतांत दरसाल धान्य किती पिकतें?' शेतकरी म्हणाला, 'कमीत कमी दोन खंडी' शेवटीं असें ठरलें कीं ज्या अर्थी शेतकऱ्याच्या या नुकसानास तुकारामच जबाबदार आहे त्या अर्थी त्यानेंच हें नुकसान भरून दिलें पाहिजे. पण तुकाराम तरी हें नुकसान कुठून भरून देणार? म्हणून त्यानें दोन खंडी दाण्याबद्दल खत लिहून देऊन आपलें घर गहाण लावून द्यावें. त्याप्रमाणें तुकारामानें खत लिहून दिलें.

## तुकोबाची निर्लोभता

यानंतर थोड्या दिवसांनीं त्या शेताची कापणी झाली. धान्य मळून पाहतात तों काय चमत्कार सांगावा? तें सतरा खंडी भरलें! अर्थातच त्या शेतकऱ्याला दोन खंडी देऊन बाकीचें तुकारामाच्या हवालीं करण्याचें गांवकऱ्यांनीं ठरविलें. पण तुकाराम तें कुठलें घ्यायला बसला होता! तो म्हणाला, 'ठरल्याप्रमाणें अर्धा मण मला द्या; बाकीचें त्यालाच देऊन टाका.' पण गांवकऱ्यांना तें पसंत पडेना. तेव्हां शेवटी देहूचे देशपांडे महादाजी पंत म्हणून होते ते अडल्या गरजेला जिजाईला मदत करीत असत, त्यांच्याकडे तें ठेवावें असें ठरलें आणि या देशपांड्यांनीं त्याचा विनियोग विठोबाच्या देवालयाच्या जीर्णोद्धाराकडे केला.

आणखीही अशीच एक चमत्कारिक गोष्ट आहे:—

देहू गांवांत एक सावकार होता. त्याच्याकडे द्रव्य फार असल्यामुळें नित्य चोरांची भीति. सारी रात्र त्याला झोप नसे. तुकोबा रात्रीच्या रात्री भजन करीत असतो, तेव्हां त्याला वेठीला धरला तर त्याचेंही काम होईल आणि आपलेंही होईल असा विचार करून तो एक दिवस तुकोबाकडे येऊन म्हणाला, 'बुवा! तुम्ही सबंध रात्र जागे राहून भजन करीत असतां, मग आजपासून माझ्या घराभोंवतीं फिरूनच भजनें कराना; म्हणजे मला तरी सुखानें झोप घेतां येईल.

बुवा म्हणाले, "ठीक आहे."

त्याप्रमाणें रात्र होतांच बुवा तंबोरा घेऊन सावकाराच्या घरीं आले आणि तोंडानें हरिनामाचा गजर करीत सावकाराच्या घराभोंवतीं फेऱ्या घालूं लागले! चार–दोन दिवस अशा रीतीनें गेल्यावर एके दिवशीं मध्यरात्रीं खरोखरच दोघे तिघे चोर त्या घरापाशीं आले. पहातात तर बोवा भजन करीत घराभोंवतीं फिरताहेत. तुकोबांनीं त्यांना पाहून एवढ्या रात्रीं इथें कशाला आलां म्हणून विचारलें. चोर म्हणाले 'हा सावकार चांगला श्रीमंत आहे. तेव्हां आम्हीं त्याच्या घरांत शिरून कांहीं मिळालें तर पाहणार आहों. तुम्हीं जरा इथें भिंतीला टेकून उभे रहा!' बुवा भिंतीला टेकून उभे

राहिले. तेव्हां चोरांनीं त्यांच्या खांद्यावर चढून वरची खिडकी गांठली आणि तींतून आंत शिरून बराच ऐवज घेऊन ते तसेच बाहेर आले आणि बोवांना " आतां चालू दे तुमचें भजन !" असें सांगून निघून गेले !

### चोरांचा पश्चात्ताप

सकाळीं उठल्यावर सावकाराला ही गोष्ट कळली तेव्हां तो तुकारामाला म्हणाला, " माझें द्रव्य मी तुमच्याकडून भरून घेणार !"

बुवा विचारांत पडले, पण पांडुरंग त्यांच्या पाठीशीं होताच. बुवांनी पांडुरंगाचा धांवा चालू केला.

तिकडे चोर जे त्या सावकाराच्या घराबाहेर पडले त्यांना कांहीं केल्या आपल्या घराची वाटच सांपडेना. थोडें चालून जावें तों पुनः सावकाराच्या घराशींच आहों असें वाटावें, असें एकसारखें होऊं लागलें ! तेव्हां त्यांना त्या सावकाराच्या घराभोंवती फिरणाऱ्या तुकारामाची आठवण झाली आणि त्या सत्पुरुषाच्या खांद्यावर आपण चढलों ही फार मोठी चूक झाली असें वाटून ते आपण होऊनच सावकाराच्या घरीं आले आणि त्याचें द्रव्य त्याच्या हवालीं करून निघून गेले !

दुसऱ्या एका प्रसंगीं कांहीं चोरांनीं खुद्द तुकारामबुवांचीच म्हैस रात्रीं गोठ्यांतून सोडून नेली होती. पण पांडुरंगानें एका विक्राळ पुरुषाचें रुप घेऊन त्या चोरांना वाटेंतच गांठलें आणि त्यांच्याकडून ती म्हैस पुनः तुमारामबुवांच्या गोठ्यांत नेऊन बांधविली !

अशा रीतीनें श्रीपांडुरंग तुकोबांच्या सहाय्याला नेहमीं सज्ज असत.

---

**ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स**

**२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८५४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण होलसेल व रिटेलर्स**

# सिद्धीच्या मागें लागूं नका—११

—श्रीरामकृष्ण परमहंस

**श्रीरामकृष्ण परमहंस यांचीं बोधवचनें म्हणजे उपनिषदांचें सारसर्वस्व होय. आणि त्यांना श्री. राजगोपालचारी यांनीं चढविलेला सुंदर साजशृंगार यामुळें कोंदणांत बसविलेल्या हिऱ्यांचें सौंदर्य त्यांना प्राप्त झालेलें आहे आमच्या वाचकांसाठीं त्यांचा सुबोध अनुवाद दर अंकांतून देण्यांत येत असतो.**

**— संपादक**

योगसाधना केल्यामुळें लोकांना आश्चर्यचकित करून सोडणारे नानाविध चमत्कार करून दाखवितां येतात. ज्यानें सिद्धि प्राप्त करून घेतल्या आहेत तो नाना चमत्कार करून दाखवूं शकतो. ही शक्ति खरोखर आश्चर्यकारक असते. निसर्गाचे नियमही ती शक्ति धाब्यावर बसवूं शकते. सिद्धी प्राप्त करून घेऊन कांहीं योगी चमत्कार करून दाखवितात व लोकांना थक्क करून सोडतात. अशा योग्याचे जे शिष्य असतात ते मग लोकांत त्याची जाहिरात करतात व असंख्य लोक त्यांच्या मागें लागतात.

भगवान रामकृष्ण परमहंस यांचें अशा चमत्कारांच्या बाबतींत मत काय होतें हें समजून घेण्यासारखें आहे. अशा प्रकारच्या सिद्धीच्या मागें लागणें व त्यांच्या सहाय्यानें लोकांना झुलविणें योग्य नाहीं असें ते म्हणत असत.

**सिद्धी आणि चमत्कार**

कोणी गृहस्थ त्यांच्याजवळ येऊन जर सांगूं लागला कीं, ‘त्या अमूक गांवीं कोणी एक योगी आला आहे व तो लोकांना आश्चर्यकारक चमत्कार करून दाखवितो; वाटल्यास प्रत्यक्ष जाऊन पहा आणि खात्री करून घ्या.’

यावर रामकृष्ण म्हणत असत कीं, ‘कृपा करून तेथें जाण्याची तसदी घेऊं नका. त्यांच्यापासून तुमचा कांहीं फायदा होईल अशा अपेक्षेनें तर तेथें मुळींच जाऊं नका.’

योगी लोक सिद्धीच्या बळावर जे नाना चमत्कार करून दाखवितात ते सारे खोटे असतात किंवा तें थोतांड आहे असें म्हणण्याचा त्यांचा आशय नसे. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ एवढाच असे कीं, ईश्वर प्राप्तीचा तो मार्ग नव्हे. चमत्कार करण्याचें सामर्थ्य संपादन करणें हा कांहीं देवाच्या भक्तीचा योग्य मार्ग नव्हे. चमत्कार पाहून किंवा सिद्धींच्या बळावर त्या करून दाखविल्यानें ईशप्राप्तीच्या दृष्टीनें तुमचा कांहींएक फायदा होणार नाहीं.

## भक्तिमार्गावरील कांटेरी झुडपें

ज्याला परब्रम्हाप्रत जावयाचें आहे, परब्रम्ह प्राप्त करून घ्यावयाचें आहे व जो त्या मार्गानें जात आहे त्याच्या सरळ मार्गाआड येणारीं हीं कांटेरी झुडपें आहेत. त्यांत अडखळून पडायला व ठेचाळायला होतें. तेव्हां त्या चमत्कारांत गुंतून जाऊं नका. तुमचीं दुःखें मी मंत्राच्या सहाय्यानें दूर करीन व माझ्या ठायीं असलेल्या योगसामर्थ्याच्या बळावर कोर्टकचेरींत चाललेल्या तुमच्या दाव्यांत यश मिळवून देऊं असें सांगणाऱ्याच्या वाऱ्याला उभे राहूं नका. जे खरे देवभक्त आहेत ते अशा मार्गाकडे वळणार नाहींत. त्यांना ईशकृपेशिवाय दुसऱ्या कशाचीहि आकांक्षा नसते. तुमचा भक्तिभाव पराकोटीला पोहोंचला असतां, तुम्हीं कांहीं योगांचें साधन केलें असतां किंवा विशिष्ट प्रकारच्या शिस्तीनें वागलें असतां तुमच्या जवळ कांहीं चमत्कार करण्याचें सामर्थ्य येईल. परंतु तें स्वाभाविकरित्या येईल. जो खरा भक्त आहे तो तशा प्रकारच्या सामर्थ्यामागें केव्हांही लागणार नाहीं. त्याला त्याचें मोल वाटणार नाहीं.

आपण जेवतों, खातों, त्यामुळें मल मूत्र किंवा शरिराला घाम येतो; परंतु तेवढ्यासाठीं आपण जेवतों खातों का? खरा भक्त जो भक्ति करतो किंवा योगसाधना करतो तो आपणास अमूक प्रकारची सिद्धि प्राप्त व्हावी म्हणून करीत नाहीं. त्याला ती विष्टेप्रमाणें वाटते.

## अहंकाराचें पोषण

सिद्धी प्राप्त झाल्यानें त्या सिद्धाच्याठायीं अहंकार निर्माण होतो. आणि तो अहंकार भक्ति मार्गात व्यत्यय आणणारा असतो. ईश प्राप्तीच्या मार्गातील तें एक विघ्न आहे. आणि म्हणूनच श्रीरामकृष्ण म्हणत असत कीं, सिद्धी म्हणजे योगवृक्षावरील बांडगुळें होत.

श्रीरामकृष्णानीं अशा एका योग्याची गोष्ट सांगितली. 'कोणी एक योगी आपल्या गुरुजीजवळ गेला आणि सांगूं लागला कीं, गेली सतत चौदा वर्षें अरण्यवास पत्करून मी तपश्चरण केलें व त्यामुळें पाण्यावरून चालत जाण्याची सिद्धि मला प्राप्त झाली आहे'

## एवढे कष्ट कशाला?

यावर गुरुजी काय म्हणाले माहीत आहे. ते म्हणाले, 'बाबारे! त्यासाठीं एवढे कष्ट कां बरें घेतलेस? काय सांगावें तुला? तुला नदीपलीकडे जायचें असल्यास होडीवाल्यास एक आणा, दीड आणा दिला म्हणजे तो तुला सुखरूपपणें पैलतीरास नेऊन सोडील! त्यासाठीं चौदा वर्षें तपश्चरण करण्याची व अरण्यवास पत्करण्याची काय बरें

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद



लें० : एक साईभक्त

अध्याय ११ वा (पुढें चालू)

श्री गणेशास, सरस्वतीस, गुरूंस, कुलदैवतास, सीतारामचंद्रास, सद्गुरु साई-नाथास नमस्कार. मागील अध्यायांत बाबा एका लहानशा फळीवर कसे शयन करीत असत व कोणास न दिसतां तीवर ते कसे चढत व मग तेथून ते कसे खालीं उतरत हें आपण पाहिलें. हिंदू असो वा यवन असो त्या उभयतांकडे ते समभावानें पाहत असत. त्याचप्रमाणें आपण त्यांच्या आयुर्मर्यादेचें पर्यालोचन केलें. आतां हा अकरावा अध्याय गुरुकथेचा गोड सांठा असून आपण तो दृढभक्तीनें साईचरणी समर्पण करूं या. येणेंकरून आपणांस सगुण ध्यान घडेल. हेंच एक एकादश रुद्रावर्तन असून पंच–महाभूतावर बाबांची कशी सत्ता होती याबद्दलचा बाबांचा महिमा कळेल. इंद्र अग्नि आणि वरूण देव बाबांच्या वचनांस कसे मानीत त्याचें आतां आपण दिग्दर्शन करूंया. तेव्हां श्रोतेहो आतां एकचित्तानें लक्ष द्या.

पूर्ण विरक्तांत विरक्त असे श्रीसाईनाथ असून ते आपल्या अनन्य भक्तांचें विश्रांतिस्थान होते. सप्रेमचित्तानें आपण त्यांचें स्मरण करूं या. गुरुवाक्यावर विश्वास हेंच जणूं आसन त्यांना आपण बसवयास देऊन सर्वसंकल्प संन्यासन या संकल्पानें यांचें पूजन करूं या. प्रतिमा, स्थंडिल, अग्नि, तेज, सूर्यमंडल, उदक व द्विज या

---

जरूरी होती? कशाला या यातायाती! तूं संपादन केलेल्या सिद्धींची किंमत आण्या दीड आण्यांपेक्षां मुळींच अधिक नाही!'

तेव्हां सांगावयाचें एवढेंच कीं, एखादी सिद्धी प्राप्त करून घेण्यासाठीं कोणीही आपल्या शक्तीचा व वेळेचा अपव्यय करूं नये. देवाची कृपादृष्टि आपल्याकडे वळावी यासाठींच मनोभावें त्याची भक्ति करावी. आपल्या चमत्कारांच्या सहाय्यानें जे कोणी तुमच्यावर मोहनी पाडूं इच्छित असतील त्यांच्या वाऱ्यालाही उभे राहूं नका. तुमचा त्यापासून कांहीं एक फायदा होणार नाहीं. हेंच श्रीरामकृष्णांच्या शिकवणुकीचें सार आहे.

---

सातां पेक्षांही श्रीगुरु श्रेष्ठ आहेत. अनन्यभावें त्यांचे चरण धरीतां गुरुच काय पण परब्रह्म सुद्धां हेलावतें असें हें गुरुपूजेचें नवल असून गुरुभक्तानांच याचा अनुभव येतो. पूजक जोंपर्यंत साकार आहे तोंपर्यंत त्यांस देहधारी गुरूची आवश्यकता आहे. निराकारास निराकाराची जरूरी, असा शास्त्रनिर्धार आहे. सगुणाचें ध्यान केल्याशिवाय भक्तिभाव केव्हांही प्रगट होत नाहीं. जोंपर्यंत सप्रेमभक्ति घडत नाहीं तोंपर्यंत मनाची कळी उघडत नाहीं. कळी उमलल्याशिवाय तिला वास येत नाहीं. तींत मकरंद नसतो आणि भ्रमर ढुंकूनसुद्धां तिच्याकडे पाहत नाहीं. सगुण तें साकार असतें. निर्गुण निराकार असतें परंतु हीं उभयतां परस्परांहून भिन्न नाहींत. साकार आणि निराकार हीं एकच आहेत. तूप असतें तें थिजलेलें असो वा वितळलेलें असो. त्यांस आपण तूपच म्हणतो. त्याचप्रमाणें सगुण निर्गुण हीं एकच असून ह्या विश्वरूपीं समरसलीं आहेत. डोळे भरून जें आपणांस पाहतां येतें, ज्याच्या पायीं आपण माथा टेवूं शकतों, ज्या ठिकाणीं आपलें ध्यान लागतें व आपणांस आवड उत्पन्न होतें, ज्याच्या संगतींत आपण प्रेमवार्ता करूं शकतों, ज्याची आपण गंध अक्षता वाहून पूजा करितों. तेंच सगुण रूप. म्हणूनच आकृति हवी निर्गुणाहून सगुणाचें आकलन फार सोपें आहे. सगुणाविषयीं प्रेम दृढ झालें म्हणजे निर्गुणाचा बोध आपणांस आपोआप होऊं लागतो. भक्तांना निर्गुणाचें ज्ञान व्हावें म्हणून बाबा पुष्कळ उपाय योजीत. अधिकारानुरूप त्यांनीं त्यांस दूर बसवावें व बहुतकाळ दर्शन देऊं नये. कोणाला त्यांनीं देशांतरास पाठवावें, कोणास शिरडींतच एकांतांत बसवावें तर कोणाला वाड्यांत अडकवून पोथीचे नेम घ्यावेत. अशा रीतीनें वर्षानुवर्षे हा अभ्यास होतांच निर्गुणाचा ध्यास वाढेल आणि आसनीं, शयनीं व भोजनीं मनास बाबांचा सहवास जडेल.

हा देह नाशिवंत असून केव्हांतरी त्याचा अंत होणारच म्हणून भक्ति करावी. खंत न करितां अनाद्य अनंताकडे लक्ष ठेवावें. आपणांस दृश्य असणारा हा विश्वाचा पसारा हा सारा अव्यक्ताचा खेळ आहे. अव्यक्तांतूनच आपण आकारास येतो आणि अखेर माघारीं अव्यक्तींत लीन होतो. हीं 'आब्रह्मस्तंब' सृष्टी जशी आपणास समग्र दिसते तशीच ती निराळी आहे. हीसुद्धां अव्यक्तापोटीं उपजली असून त्यांतच ती शेवटीं समरस होणार आहे. म्हणून कोणासही मरण नाहीं. मग तें बाबांस कोठून येणार? श्रीसाई नित्य शुद्ध बुद्ध चिरंतन निर्मम असे आहेत. बाबांना कोणी भगवतभक्त वा महा भागवत म्हणोत. आम्हांस ते प्रत्यक्ष भगवंत आहेत. गंगा सागराला भेटावयास जातांना वाटेंत तहानेले असतील त्यांना शीतल करते. काठावरच्या सर्व वृक्षवल्लींस जीवन देते आणि सकळांची तृषा हरण करिते. त्याचप्रमाणें संतांची अवतार स्थिति असते. ते प्रगट होतात आणि जातात; पण आपल्या आचरणानें ते सर्व जगाला पावन करितात. त्यांच्या अंगीं कमालीची क्षमाशीलता, विलक्षण नैसर्गिक शांति, सरळपणा, मृदुता, सोशिकपणा त्याचप्रमाणें निरुपम संतुष्टता असते. ते देहधारी

असून संसारीं वावरत असलेले दिसत असले तरी ते निर्गुण, निर्विकारी असून अंतरीं निर्मुक्त आणि निःसंग असे असतात. स्वतः भगवान् श्रीकृष्ण म्हणतात कीं, संत म्हणजे त्यांचा आत्मा असून ते म्हणजे संत त्यांच्या सजीव प्रतिमाच आहेत. इतकेंच काय पण संत—सप्रेम तो प्रत्यक्ष तेंच. प्रतिमारूपही संतांस साजत नाहीं. संत म्हणजे माझें निश्चळ स्वरूप आहे, म्हणूनच त्यांच्या लाजेस्तव भक्तांचें ओझें देव वाहत असतो. संतांना जो अनन्य शरण गेला आहे, त्याच्या चरणाचे वंदन श्रीकृष्ण करितात, असें देवांनीं उद्धवास सांगितलें आहे. सगुणांतला जो सगुण, निर्गुणांत निर्गुण, गुणवंतांत अतिय गुणी आणि गुणियामध्यें सर्व गुणियांचा राजा, सर्व काम उपभोगून जो कृतकृत्य झालेला, नेहमींच अति तृप्त आणि संतुष्ट, अनवरत आणि आत्मानिरत असून जो सुखदुःखातित आहे, जो सर्वदा अनिर्वाच्य असून मूर्त ब्रह्मदैवत आहे त्याच्या आनंदाचें वैभव कोण वर्णन करू शकेल का ? ही अनिर्वचनीय शक्ति दृश्यरूपानें या पृथ्वीवर अवतरली असून प्रत्यक्ष सच्चिदानंद सुखाची मूर्तीच आहे ती, ‘आनंदोब्रह्मेति’ असे आपण नेहमीं ऐकतो, पोथींत वाचतो पण भाविकांस त्याची प्रतिति शिरडींत येते. धर्माधर्मादि असें त्यांचें लक्षण आहे. हा संसार अतिशय विलक्षण असल्यामुळें अनात्मज्ञांचे क्षणोक्षणीं रक्षण करणें त्यांना भाग पडतें. परंतु हा आत्मज्ञांचा विषय नाहीं. ते आत्म-स्वरुपांच आश्रय घेऊन ते नित्यमुक्त आनंदमय आणि नेहमीं चिन्मय रूप असतात. बाबाच या सर्वांचे अधिष्ठान आहेत. मग त्यांना आसन तरी कोठले ? परंतु बाबा भक्तांच्या भावना जाणणारे असल्यामुळें त्यावरही रौप्य सिंहासनासारखें ते शोभून दिसतात.

बाबांची बहुत दिवसांची बैठक म्हणजे एक गोणपाटाचा तुकडा आणि टेकायला भिंत. भक्त मोठ्या प्रेमानें आणि भक्तीनें त्या गोणपटावर त्यांना बसावयास एक सुरे-खशी गादी ठेवतात आणि भिंतीशीं एक तक्या उभा करतात. भक्तांचे मनोगत जाणून बाबाही तसेंच वागतात.

बाबांचें वास्तव्य जरी शिरडींत असलें तरी ते सर्व ठिकाणीं आहेत, याचा अनुभव ते आपल्या भक्तांना नेहमींच देत. स्वतः जरी निर्विकार असले तरी ते भक्त-भावार्थानुसार सर्व प्रकारचे पूजा उपचार स्वीकारीत. कोणी त्यांच्यावर चवरी ढाळीत, कोणी त्यांना पंख्यानें वारा घालीत तर कोणी मंगलवाद्यांच्या गजरांत त्यांना पूजा समर्पीत. कोणी त्यांचें हातपाय प्रक्षालन करावेत, त्यांना त्रयोदशगुणी विडा अर्पण करावा. गंध अत्तर ल्यावें किंवा महानैवेद्य दाखवावा. कोणी दुबोटी आडवें गंध लावावें किंवा शिवलिंगावर जसें सलंग गंध लावतात, तसेंच कोणी त्यांना कस्तुरीमिश्रित सुगंधी चंदन चर्चावें, आणि बाबांनीं हें भक्तांखातर सारें करून घ्यावें. (अपूर्ण)

---

# एकाग्रता कशी साधावी ?

--विनोबा भावे

एकाग्रता हवी, परंतु ती कशी करावयाची ? त्यासाठीं काय केलें पाहिजे ? भगवान् सांगतात आत्म्यांत मन रोवून :—

"न किंचिदपि चिंतयेत्"— दुसरें कांहींच चिंतूं नये.

परंतु ही गोष्ट कशी साधावयाची ? मन निवान्त करणें ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. विचारांची चक्रें जोरानें थांबल्याशिवाय एकाग्रता कोठली ? बाहेरचें चक्र एक वेळ कसें तरी थांबवितां येईल; पण आंत चक्र सुरूच असतें. चित्ताच्या एकाग्रतेला बाह्य साधनें जसजशीं सांगूं तसतसें हें आंतील चक्र अधिकच वेगानें चालूं लागतें. तुम्हीं आसन घाला, ताठ बसा, डोळे स्थिर करा, परंतु एवढ्यानें मन एकाग्र करतां येणार नाहीं. मुख्य वस्तु ही आहे, कीं मनांतील चक्र बंद करणें साधलें पाहिजे.

## भाजींत मीठ कमी

बाहेरचा अपरंपार संसार मनांत भरलेला असतो. तो बंद केल्याशिवाय एकाग्रता अशक्य. आपल्या आत्म्याची अपार ज्ञानशक्ति बाह्य क्षुद्र वस्तूंतच आपण खर्च करतों; परंतु असें होतां कामा नये. ज्याप्रमाणें दुसऱ्याला न लुटतां स्वतःच्या प्रयत्नानें श्रीमंत झालेला मनुष्य अनाठायीं खर्चणार नाहीं, त्याचप्रमाणें आपण आपल्या आत्म्याची ज्ञानशक्ति क्षुद्र वस्तूंच्या चिंतनांत खर्च करूं नये. ही ज्ञानशक्ति हा आपला अमूल्य ठेवा आहे; परंतु स्थूल विषयांत ती आपण खर्च करतों. ही भाजी म्हणे चांगली नाहीं झाली. हिच्यांत मीठ कमी झालें. किती गुंजा बाबा कमी झालें ? मीठ अर्धा कण कमी पडलें या महान् विचारांतच आमचें ज्ञान खर्च होतें. लहान मुलांना शाळेच्या चार भिंतीच्या आंत शिकवितात. झाडाखालीं घेऊन बसतील तर कावळे चिमण्या पाहून त्यांचें मन एकाग्र होणार नाहीं. लहान मुलेंच तीं. कावळा चिमणी दिसली नाहीं म्हणजे झाली त्यांची एकाग्रता. परंतु आम्ही झालों घोडे. आम्हांला शिंगें फुटलीं. आमची एकाग्रता सात सात भिंतींच्या आंत कोणी आम्हांस ठेवलें तरी व्हावयाची नाहीं. कारण दुनियेंतील बारीकसारीक गोष्टींची आम्ही चर्चा करणार. जें ज्ञान परमेश्वरास गांठूं शकतें तें भाजीच्या चवीची चर्चा करण्यांतच आम्हीं दवडणार व त्यांत कृतार्थता मानणार !

## मन क्षुद्र गोष्टींत गुंतलेलें

अहोरात्र असा हा भयानक संसार आपल्याभोंवतीं अंतर्बाह्य घोंघावत आहे. प्रार्थना किंवा भजन करण्यांतहि आमचा हेतु बाह्य. परमेश्वराशीं तन्मय होऊन एक क्षणभर तरी संसाराचा विसर पडूं दे, ही भावनाच नाहीं. प्रार्थना म्हणजेहि देखावा

अशी जेथें मनाची स्थिति आहे, तेथें आसनमांडी घातलीत काय आणि डोळे मिटलेत काय सारें व्यर्थ आहे. मनाची धांव सारखी बाहेरच वाहत राहिल्यानें मनुष्याचें सारें सामर्थ्य नष्ट होतें. कोणत्याहि प्रकारची व्यवस्था, नियंत्रणशक्ति माणसांत राहत नाहीं. ह्या गोष्टीचा अनुभव आमच्या देशांत आज पदोपदीं येत आहे. वास्तविक भारतवर्ष म्हणजे तर परमार्थाची भुमि. येथील माणसें आधींच उंच हवेंतील अशीं समजलीं जातात; परंतु या देशांत तुमची आमची काय दशा! अगदीं बारीकसारीक गोष्टींत इतकी काळजीपूर्वक चिकित्सा आम्हीं चालवितों कीं खेद वाटतो. क्षुद्र विषयांत चित्त गहून राहिलें आहे.

> " कथा पुराण ऐकतां । झोंपें नाडिलें तत्त्वतां
> खाटेवरती पडतां । व्यापी चिंता तळमळ
> ऐसी गहन कर्मगति । काय तयासी रडती "

**मनाची ठेवण**

कथा–पुराण ऐकावयास गेला तर झोंप येऊन गांठते, व झोंपेची गांठ घ्यावयास गेला तर तेथें चिंता, विचारचक्र, सुरू होतें. एकीकडे शून्याग्रता तर दुसरीकडे अनेकाग्रता. एकाग्रता कोठेंच नाहीं. इतका हा मनुष्य इंद्रियांचा गुलाम आहे. एकदां एकानें मला विचारलें, " डोळे अर्धोन्मीलित ठेवावेत असें कां सांगितलें आहे?" मीं त्याला म्हटलें, " साधेंच उत्तर देतों. डोळे जर पुरते मिटले तर झोंप लागते. ताठ ठेवले तर चोंहींकडे दृष्टि जाऊन एकाग्रता होणार नाहीं. डोळे मिटले तर झोंप लागते, हा तमोगुण आहे. ताठ ठेवले तर दृष्टि सर्वत्र जाते, हा रजोगुण आहे. यासाठीं मधली स्थिति सांगितली." तात्पर्य, मनाची ठेवण बदलल्याशिवाय एकाग्रता नाहीं. मनाची ठेवण शुद्ध पाहिजे. ती केवळ आसन घालून मिळणार नाहीं. त्यासाठीं सर्व व्यवहार शुद्ध करावयास पाहिजेत. व्यवहार शुद्ध करावयाचा म्हणजे त्याचा उद्देश बदलला पाहिजे. व्यवहार व्यक्तिगत फायद्यासाठीं, वासनातृप्तीसाठीं किंवा अशा बाह्य गोष्टीसाठीं, करावयाचा नाहीं.

आपण दिवसभर व्यवहार करतों. या दिवसभर चाललेल्या आटापेटीचा काय हेतु?

> " याजसाठीं केला होता अट्टाहास
> शेवटचा दीस गोड व्हावा । "

सारा अट्टहास, सारी धांवपळ, शेवटचा दिवस गोड व्हावा म्हणून करायची. जन्मभर कडू विष पंचवायचें. कां? ती शेवटची घडी, तें मरण, पवित्र यावें म्हणुन. दिवसाचा शेवटचा क्षण सायंकाळीं येतो. आजच्या दिवसाचें सारें कर्म जर पवित्र भावनेनें केलेलें असेल तर रात्रींची प्रार्थना गोड होईल. तो दिवसाचा शेवटचा क्षण जर गोड झाला तर दिवसाचें सारें कर्म सफळ झालें. मग माझ्या मनाची एकाग्रता होईल.

## जीवन शुद्धीची जरुरी

एकाग्रतेसाठीं अशी जीवन–शुद्धि हवी. बाह्य वस्तूचें चिंतन सुटलें पाहिजे मनुष्याचें आयुष्य म्हणजे फारसें नाहीं. परंतु एवढ्याशाहि आयुष्यांत परमेश्वरी सुखाचा अनुभव घेण्याचें सामर्थ्य आहे. दोन माणसें अगदीं एका सांच्याचीं, एका ठशाचीं. दोन डोळे, त्या डोळ्यांमध्यें तें एक नाक, व त्या नाकाला दोन नाकपुड्या. असें अगदीं सारें सारखें असतांना एक मनुष्य देवतुल्य होतो व दुसरा पशुतुल्य होतो असें कां व्हावें? एकाच परमेश्वराचीं लेकरें.

**‘ अवघी एकाचीच वीण ’**

असें असून असा फरक कां पडतो? या दोन माणसांची जात एक आहे असें पटत नाहीं. एक नराचा नारायण तर दुसरा नराचा वानर!

मनुष्य किती उंच जाऊं शकतो हें दाखविणारी माणसें पूर्वी होऊन गेलीं व आजहि आपणांत आहेत. ही अनुभवाची गोष्ट आहे. या नरदेहाची काय शक्ति आहे हें दाखविणारे संत मागें झाले व आजहि आहेत. या देहांत राहून मनुष्य जर एवढी अचाट करणी करूं शकतो तर मग माझ्या हातून कां बरें होणार नाहीं? मी माझ्या कल्पनेला मर्यादा कां बरें घालूं? ज्या नरदेहांत राहून दुसरे नरवीर झाले, त्याच नरदेहांत मीहि आहें. मग मी असा कां? कांहीं तरी माझें चुकतें आहे. हें माझें चित्त सारखें बाहेर जात आहे. दुसऱ्याचे गुणदोष पाहण्यांत तें मोठें फाजील झालें आहे. परंतु मीं दुसऱ्याचे दोष कशाला पहावे?

**“ कासया गुणदोष पाहूं आणिकांचे ।**
**मज काय त्यांचें उणें असे ॥ ”**

माझ्या ठिकाणीं दोष का कमी आहेत? मी सदैव दुसऱ्याचेच बारीकसारीक दोष पाहण्यांत दंग झालों तर चित्ताची एकाग्रता कशी साधणार? मग मला दोनच स्थिति प्राप्त होतील. शून्यावस्था म्हणजे झोंप, किंवा अनेकाग्रता. तमोगुण व रजोगुण यांतच मी गुरफटणार.

भगवंतांनीं असा बस, असे डोळे ठेव, असें आसन घाल, इत्यादि सूचना एकाग्रतेसाठीं दिल्या नाहींत असें नाहीं; परंतु चित्ताची एकाग्रता अवश्य आहे हें पटलें तर या सर्वांची उपयुक्तता. चित्ताची एकाग्रता अवश्य आहे हें प्रथम एकदां मनुष्याला पटूं दे म्हणजे मग तो स्वतःच साधना शोधून काढील.

———

## श्रीसाई निकेतनमध्यें भजनाचा कार्यक्रम

दि. १९–१०–६१: (गुरुवार) दसरा–पुण्यतिथीच्या दिवशीं श्रीसाईबाबा संस्थानच्या मुंबई येथील कचेरींत अर्थात् साईनिकेतन दादर येथें सुप्रसिद्ध श्रीसाईनाथ सेवा मंडळाचें सुश्राव्य भजन रात्रौ ८ ते ११ वाजेपर्यंत झाले व नंतर श्रीची आरती होऊन कार्यक्रम समाप्त झाला. भजनांत मुख्यतः गौळणी व श्रीसाई माउलीच्या कवनांच्या म्हणण्यांत आल्या व कार्यक्रम फारच उत्तम झाला.

———

# तुज शरणागत मी देवा !

—लेखक : एक अनुभवी भक्त

**शरणागति ही सद्भक्ताच्या जीवनांतील एक महत्त्वाचीच नव्हे तर अत्युच्च पायरी आहे. ती कशी साध्य करावयाची, ती अवस्था भक्ताच्या वांट्यास केव्हां येते व त्यांतच जीवन-साफल्य कसें आहे, याचें हें विवेचन आहे.**

शरणागति ज्याला साध्य झाली तो धन्य होय. शरणागति म्हणजे ती परमोच्च गतीच समजली पाहिजे; परंतु हा भाव भल्याभल्या माणसांत उगाच नाहीं जागा होत. त्याला ईश्वरावर असीम श्रद्धा, दृढ विश्वास लागतो. भगवंताच्या कृपेचें महत्त्व भक्ताला समजलें पाहिजे. तें ज्या प्रमाणांत समजेल त्या प्रमाणांत तो प्रभुरायाकडे वळेल व त्याला त्या प्रमाणांत शरण जाण्यांत आनंद मानील. शरणागति शिकविल्यानें येत नसते. तो अंतरींचा भाव आहे. तो अंतरांत जागा व्हावा लागतो व अंतःकरण ईश्वरी प्रेमानें व्याकुळ व्हावें लागतें.

## भगवंतावर भरिभार

मनुष्यमात्रांत जोंपर्यंत अनेक दोष आहेत व ते नाहींसे करण्यासाठीं मनुष्य झटत राहील तोपर्यंत शरणागति भावना त्याच्यांत जागृत होणार नाहीं. कधीं कधीं विचार करून व शरीरांतील सर्व शक्ति खर्च करूनहि अंगीं असलेले दोष जात नाहींत. त्या वावर्तात मनांत असून मनुष्य कधीं कधीं हतबल होतो. त्याचा अभिमान लयाला जातो. तो स्वतःला निर्बल समजूं लागतो. आतां आपणास तारणाला भगवंताशिवाय दुसरा कोणीही नाहीं. तो सर्वशक्तिमान, सर्वगुणसंपन्न, माझा प्रियमित्र व माझें भलें चिंतिणारा आहे, तो पतीतपावन तसाच दीनवत्सल आहे. मनुष्य कितीहि पापी व हीन असो; त्याची भगवंताला दया येते. त्याला जवळ करून पोटाशीं धरण्यास तो तयार असतो; कारण तो करुणाघन आहे. मी कसाही असलों, कितीही अवगुणी असलों तरी मी त्याचा आहें. त्याचाच मला आधार. त्याच्याशिवाय जवळ करणारा माझा कोणी नाहीं. त्याचें प्रेम मला संपादन करावयाचें आहे; त्याचें सहकार्य मिळवावयाचें आहे. अशाप्रकारचे विचार मनांत जागृत होऊन मनुष्य उत्तरोत्तर व्याकुळ होऊं लागतो आणि त्यावेळीं शरणागतीची भावना मनांत मूळ धरूं लागते.

जी गोष्ट दुसऱ्याकडून घडविली किंवा करविली जाते तिचें वर्णन करतां येईल; परंतु जी आपोआप होणारी किंवा भगवंताच्या कृपेमुळें होणारी गोष्ट असेल तिचें वर्णन कोण करूं शकेल ? त्याचें वर्णन कोणीहि करूं शकणार नाहीं. हें माझें शरीर,

हें माझें मन व ही माझी बुद्धि असें मी समजत होतों; परंतु तें माझें नाहीं; तसेंच या जगांतील ज्या व्यक्तींना मी माझे समजत होतों त्याहि माझ्या नाहींत. जी संपत्ति मी माझी माझी म्हणतों तीही माझी नाही. अशा रीतीनें जेव्हां त्याला उपरति होते, सर्वत्र जेव्हां निराशा वाटूं लागते तेव्हां त्याचें लक्ष भगवंताकडे लागूं लागतें. त्या भक्तवत्सलास शरण जावें, त्याचा आधार घ्यावा, असें वाटूं लागतें. असें वाटूं लागणें हीच या जगांत महत् भाग्याची गोष्ट आहे. मनुष्याकडून या जन्मीं घडावयाचा हा मोठ्यांत मोठा पुरुषार्थ होय.

## काळजी वहाणारा जगन्नायक

या मार्गावरील साधकाचा अहंकार साफ गळून गेला पाहिजे. मीं मोठा, मीं काय वाटेल तें करूं शकेन, ही भावना नष्ट झाली पाहिजे. तिचा मागमूसही रहातां कामा नये. साधक ईश्वराला शरण जातो तेव्हां त्याचा अहंकार नष्ट झालेला असतो. त्याशिवाय शरणच जाऊं शकणार नाहीं. शरणागत साधक ईश्वरापासून कशाचीही अपेक्षा करीत नाहीं, त्याला कांहीं एक मिळवायचें नसतें. भगवंताला शरण जाणें म्हणजे सर्व बाबतींत निश्चित होणें. मग त्यानें कशाचीही काळजी वहावयाची नसते. काळजी वहाणारा तो जगन्नायक या श्रद्धेनेंच तर त्याला स्वार्पण करावयाचें व सारा भरिभार त्याच्यावर टाकून त्याच्यावर विसंबून रहावयाचें.

ईश्वराला शरण गेलेलें, आयुष्यांत शरणागति साधलेले भक्त पूर्वी होते आणि आजही आहेत. त्यांना शोधुन काढून आपण त्यांचा सहवास स्वीकारला पाहिजे. तो सत्संगच आपल्या अंतःकरणांला शरणागतीची भावना पटवील व त्याला जरूर तें इंधन पुरवील. साधकाची उत्कंठा फार मोठी असते. दोषांची त्याला पूर्ण जाणीव झालेली असते; परंतु प्रयत्न करूनही इलाज चालत नाहीं अशी स्थिति प्राप्त होते. त्यावेळीं भगवंताची विश्वासपूर्वक करुणा भाकावयाची; त्याला अंतःकरणापासून हांक मारावयाची. हें भगवंता ! आतां तूंच माझा त्राता. घे मला पदरीं आणि काय वाटेल तें कर. तुझ्याविना मला गति नाहीं. शरणागति जागी झाली म्हणजे तुमची सारीं पापे व सारे दोष जळून भस्म होतील. दोष नाहींसे करायला शरणागतीसारखें रामबाण दुसरें शस्त्र नाहीं.

## स्वतःचा अभ्यास

प्रत्येक मनुष्यानें स्वतःच्या स्वभावगुणांचा, परिस्थितीचा व एकंदर वातावरणाचा बारकाईनें अभ्यास केला पाहिजे. आपले दोष नीट पारखले पाहिजेत; आपणास काय हवें, नको याचें ज्ञान करून घेतलें पाहिजे. त्यासाठीं मी काय करूं शकतों, कुठवर पोहोंचण्याची माझी शक्ति आहे याचाही अभ्यास केला पाहिजे.

मला या जगांतील अशाश्वत गोष्टींसाठीं झटावयाचें नाहीं. मी झटून त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. स्वतःचें सामर्थ्य अपुरें आहे; त्याला भगवत् कृपेची जोड करून घेतल्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं अशी मनाची बालंबाल खात्री झाली पाहिजे. आपल्या सामर्थ्याचा, बळाचा, बुद्धीचा, कशाचाही अभिमान अंतःकरणांत शिलक

रहातां कामा नये आणि मग भगवंताची कृपादृष्टि तुमच्याकडे वळूं लागेल असा विश्वास आपण जरूर बाळगावा. तो फळास आल्याशिवाय रहाणार नाहीं.

आणि एकदां का साधकाच्या अंतःकरणांत शरणागति भाव जागा झाला, भगवंताची त्याच्यावर तेवढी कृपा झाली मग काय पाहिजे? तुम्हांला जें साध्य करावयाचें होतें तें मिळालें म्हणून समजावें. मग कोणत्याही प्रकारची निराशा तुमच्या वाट्यास येणार नाहीं. सर्वत्र आशांकुर व आनंदी आनंद!

## भगवत्प्रेमाशिवाय सारें अशाश्वत

या जगांत प्रत्येक मनुष्याला कमी अधिक प्रमाणांत आवडणारीं, प्रिय वाटणारीं माणसें व वस्तु असंख्य असतात. अशा रीतीनें अनेक ठिकाणीं त्याच्या प्रेमाची वाटणी झालेली असते. अशा परिस्थितींत परमेश्वराला शरण जाण्याची भावना त्याच्या मनांत कशी जागृत होणार? आपण जोडलेले हे संबंध अशाश्वत गोष्टींशीं असतात. कधीं ना कधीं ते संबंध तुटावयाचेच असतात. मग काय बरें त्यांचा उपयोग? ते कधीं ना कधीं दुःखशोकाला कारण व्हायचे! त्या सर्व संबंधांतून आपण मोकळे व्हावयाचें आहे व फक्त शाश्वत, सनातन व सुखसागर अशा भगवंताशींच संबंध जोडावयाचा. कारण तो संबंध कधींही दुःखाला कारण होणार नाहीं. चिरंतन व शाश्वत सुखाचा आधार जो परमेश्वर त्याच्याशीं आपण आपला संबंध जोडावयाचा, त्याच्यावर श्रद्धाभाव पूर्णपणें ठेवावयाचा, त्याचेंच चिंतन, मनन करावयाचें.

आपण क्षणभर विचार करूं या. आपणास सर्वांत अधिक जरुरी कशाची बरें भासते? धनाची. नंतर विचार करतां करतां वाटूं लागतें कीं केवळ धनानें कुठें भागत आहे? वस्तूंची जरूरी अधिक. त्याहीपेक्षां आपले संबंधीजन व सर्वांत अधिक आवश्यक म्हणजे आपलें शरीर. धनाची जरूरी वाटते लोभामुळें. सुखोपभोग हवेत म्हणून नाना वस्तूंची जरूरी भासते. कांहीं आप्तसंबंधी याबद्दल मन मोहांत गुरफटलेलें असतें म्हणून त्यांची जरूरी. या साऱ्या गोष्टी अनित्य व नाशिवंत आहेत. त्यांच्यामुळें मनुष्याची शांति नाहींशी होते. मनांत नाना प्रकारच्या इच्छा थोकाळत असतात. त्यांची निवृत्ति करतां आली पाहिजे.

## इच्छांचा नायनाट

साधकानें कोणत्याहि इच्छेच्या आहारीं जातां कामा नये. साऱ्या इच्छा झोडपून काढल्या पाहिजेत. इच्छा कधींहि संपत नाहींत. साधकानें निर्धारपूर्वक सर्व इच्छांचा त्याग केला पाहिजे. एक प्रभु आपला रक्षणकर्ता. त्याचीच इच्छा बाळगावयाची. त्याच्या हातीं आपलें जीवनसर्वस्व सोपवावयाचें. परमेश्वराशिवाय आम्हांला दुसऱ्या कोणत्याहि गोष्टींत गोडी वाटतां कामा नये. माझा कोणी नाहीं. मी कोणाचा नाहीं. मला या जगांत कशाचीहि अपेक्षा नाहीं. फक्त भगवत्कृपा हेंच माझें सर्वस्व. माझा सारा भरिभार त्याच्यावर. सारा विश्वास त्याच्यावर. अशा रीतीनें भगवंताशीं तुमचे संबंध, तुमची सलगी वाढत गेली म्हणजे मग त्यांतच गोडी वाटूं लागेल. सर्व त्याला अर्पण करावयाचें, जें जें करावयाचें तें त्याच्यासाठीं करावयाचें या भावनेने तुम्ही वागूं लागलां म्हणजे तुमच्या अंतःकरणांत शरणागतीची भावना जागृत होईल. त्यामुळें तुम्ही शाश्वत सुखाचे वाटेकरी व्हाल.

———

# गरजवंताला अक्कल नसते !

**माणूस वासनांचा, कामनांचा व गरजांचा गुलाम बनतो आणि मग स्वतःचें स्वातंत्र्य गमावून बसतो. अगतिक व अक्कलशून्य बनतो ! मग त्यानें करावयाचें काय ?**

'गरजवंतास अक्कल नसते' अशी आपल्यांत एक म्हण आहे. गरज आणि अक्कल या दोन्हीं गोष्टी एकत्र राहूं शकत नाहींत. जेथें एक आहे तेथें दुसरीचा अभाव ठरलेला. मनुष्य इतर बाबतींत कितीही हुषार शहाणासुरता असूं द्या. पट्टीचा वक्ता असूं द्या, कीं लेखक असूं द्या. डॉक्टर असूं द्या कीं कुशल वकील असूं द्या. त्याला कशाची तरी गरज लागली म्हणजे तो दुबळा बनतो. अगतिक बनतो. पण कोणी कधीं या गोष्टींचा विचार केला आहे ?

## माणूस गरजेचा गुलाम

माणसाला गरज उत्पन्न झाली म्हणजे तो कोणाचेही पाय धरण्यास तयार होतो. बाबा, पुता करून हांजी हांजी करायलाहि कमी करीत नाहीं. मग त्याची अक्कलच जाग्यावर रहात नाहीं. त्याची विचारशक्ति नाहींशी होते. तो त्या गरजेचा गुलाम बनतो. तिच्यासाठीं वाटेल त्याच्यापुढें वाकायला तो तयार होतो !

परंतु गरज ही किती गोड वाटत असते. साखरेंतहि तेवढी गोडी नसेल. ज्याच्याकडून गरज भागण्यासारखी असेल त्याच्यापुढें माणूस गोगलगाय बनतो. माणूस गरजेच्या मागें लागला म्हणजे तो दांभिकहि बनतो. स्वतःच्या मनांतील विचार त्याला आंतल्या आंत दडपून ठेवावे लागतात. आंत एक व बाहेर एक अशी होते त्याची स्थिति. आपली गरज भागविण्यासाठीं गरजवंत कोणत्या थराला जाईल हें सांगतां येणें कठीण असतें.

## साऱ्या दुर्गुणांचा बादशहा

दांभिकपणा ! किती दुष्ट दुर्गुण आहे हा ! जणूं काय साऱ्या दुर्गुणांचा बादशहा ! माणसांत दांभिकपणा नसावा. त्यापायीं तो माणुसकीला मुकतो. या दुर्गुणापासून दूर राहण्याचा प्रयत्न प्रत्येकानें केला पाहिजे, परंतु तो कसा व्हावा ? जो गरजवंत बनला, नाना प्रकारच्या गरजांची साखळी ज्याच्यामागें लागली त्याच्यामागें दांभिकपणा धांव घेत असतो !

गरजू माणसाला दुहेरी जीवन जगावें लागत असतें. हें सारें मनांतल्या मनांत शिजत असतें. ज्याच्याकडून आपली गरज भागवून घ्यायची असते त्याच्याशीं नम्रतेनें गोडीगुलाबीनें व सभ्यत्वानें वागावयाचें व इतरांशीं आढ्यता, मग्रूरी, सडेतोडपणा,

निस्पृहता वगैरे गुण संभाळून वागावयाचें असें हें दुहेरी जीवन जगणें त्याच्या वांट्यास येत असतें.

अशा रीतीनें जगांत वावरत असतां त्या माणसाला एक फार मोठा अनुभव येत असतो. तो कोणता ? या जगांत कधीं कोणाची गरज लागेल व त्याच्या हातांपायां पडावें लागेल हें समजत नाहीं; तेव्हां आपण सर्वांशीं सख्यत्वानें, वागावें, सर्वांना सलाम करीत रहावें. कधींही कोणाला तोडूं नये. न जाणो कधीं कोणाची गरज लागेल सांगतां येत नाहीं. हें एक प्रकारचें भय आहे व त्या भीतीनें तो पछाडलेला असतो. मग त्या माणसांतला मर्दपणा ढिला पडूं लागतो. त्याच्या ठिकाणीं दुबळेपणा येऊं लागतो.

## या आपत्तीचें कारण

या सर्व आपत्तीचें काय बरें कारण ! याचें कारण कामना. मला अमुक पाहिजे, तमुक पाहिजे, ही कामना आपल्या इच्छा, कामना, वासना यांना कांहीं अंतपार आहे का ? त्या कधीं तरी संपतात का ? त्यांच्या पलिकडे आपणांस कधीं तरी जातां येतें का ? त्या कामनापायीं, इच्छा आकांक्षांपायी आम्हीं वाटेल त्याचे गुलाम बनण्यास तयार होतों. ज्यानें इच्छा, वासना किंवा कामना यांच्याकडे पाठ फिरविली त्याला कोणाचाही दास किंवा गुलाम बनावें लागणार नाहीं. 'निष्कामः कस्य किंकर ?' निष्काम माणूस कोणाचेंही दास्यत्व स्वीकारीत नाहीं.

आणि दास्यत्व म्हणजे काय ? स्वतःचें स्वातंत्र्य गमावून बसणें. दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणें, दुसरा वांकवील तसें वाकवून घेणें, स्वतःची बुद्धि व विचारशक्ति गहाण टाकणें ! हें का जीवन झालें ?

मनुष्यानें स्वतःपुढें उच्चतम ध्येय ठेऊन आपली जीवननौका डौलानें हाकलली पाहिजे. त्याऐवजीं तो वासनांच्या तावडींत सांपडला म्हणजे त्याचा तोल गेला व डौलही गेला म्हणून समजावें. मग त्याची जीवननौका हेलकावे खात खात कोणत्या तीराला जाऊन लागेल व आदळेल हें सांगतां येणें कठीण आहे.

## अरिष्ट कसें टाळावयाचें ?

हें अरिष्ट कसें बरें टाळावयाचें ? या संकटांतून आपणांस कोण बरें मुक्त करील ? वासनामुक्ति ! वासनांचा त्याग करावयाचा, गरजवंत व्हायचें नाहीं; गरजांचा नायनाट करून टाकावयाचा. ज्या गोष्टीमुळें आपली अकल व आपली बुद्धिमत्ता गहाण टाकावी लागते, त्या गरजा आणि वासना जितक्या म्हणून कमी करीत करीत शेवटीं शून्यावर आणून ठेवतां येतील, तेवढ्या आणून ठेवणें, हें आपलें ध्येय असलें पाहिजे.

# नामस्मरणाचें महत्व

## भगवंताची प्राप्ति

भगवंताच्या प्रेमास पात्र होणें ही आपल्या आटोक्यांतील गोष्ट आहे; परंतु कोणाच्या ? ज्यानें त्याच्या भेटीचा ध्यास घेतला असेल त्याच्या, इतरांच्या नाहीं बरें ! भगवंताचा ध्यास केव्हां लागेल ? आपल्या जीवनाचें सार्थक त्याच्याशिवाय होणें नाहीं, हें समजेल तेव्हां व जीवनांत त्याची किती आवश्यकता आहे, याची जाणीव होईल तेव्हां. आणि या दोन्हीं गोष्टी केव्हां घडतात माहीत आहे ? तुमच्या सुदैवानें तुम्हांला सत्संगाचा लाभ घडेल तेव्हां. या मार्गांत सत्संग ही एक अत्यावश्यक गोष्ट आहे.

× × ×

## भगवंत काय पहातो ?

भगवंतासारखा दयाळु दुसरा कोणीही नाहीं. त्याच्या दयेला पारावार नाहीं. तो तुमचा जुनापुराणा इतिहास पहात नाहीं. गतकाळाचीं पानें उलटून पहाण्याच्या भरीस तो पडत नाहीं. पूर्वींच्या अमदानींत तुम्ही काय काय प्रताप गाजविले, कोणतीं दुष्कृत्यें किंवा सत्कृत्यें तुमच्या हातून घडली याची दखल तो घेत नाहीं. मग तो काय पहातो ?

---

मनुष्याच्या तृष्णेला अंत नाहीं पार. मरेपर्यंत ती सुटत नाहीं. आणि ती भागविण्यासाठीं तर आपली सतत व सारी धडपड चाललेली असते; आणि माणूस मुक्त व्हावयाचा असेल तर त्यानें वासनामुक्ति हें आपलें ध्येय ठेविलें पाहिजे.

## आमचें तत्त्वज्ञान गप्पांपुरतें !

होय; हें सारें कांहीं आम्हांला समजतें. जगांतील सर्व धर्मांनी व धर्मगुरूंनीं हीच आजवर शिकवण दिलेली आहे. आम्हींहि त्याबाबतींत तावातावानें खूप बोलतों व लिहितों. गप्पा मारण्यापुरतें हें तत्त्वज्ञान आमच्या पदरीं असतें; परंतु अंतरांत काय बरें असतें ? अंतरांत नाना वासना व कामना उचंबळून येत असतात. त्यामुळें मन अस्वस्थ झालेलें असतें.

तेव्हां पुन्हां पुन्हां हेंच सांगत रहावें व लिहीत रहावेसें वाटतें कीं, बाबांनो ! गरजवंत बनूं नका, तुम्हांला सुख पाहिजे असल्यास व दुसऱ्याचें तसेंच नाना दुर्गुणांचें दास्यत्व पत्करावयाचें नसल्यास वासना, कामना, इच्छा गरजा यांचा होम करा आणि स्वतंत्र व पवित्र बना

आज तुम्हीं कसे आहांत, कसे वागतां, हेंच तो पहातो. तेव्हां भूतकाळाला तुम्हीही राम राम ठोका. चला, मागचें विसरा. ' जुनें जाऊं द्या मरणालागुनी ' आणि पुढें पाऊल टाका. भगवंताला अनन्यभावें शरण जा. जेथें तेथें त्याची आठवण ठेवा. भगवंताशीं सान्निध्य जोडूं लागलांत म्हणजे गतकाळांत जर तुमच्याकडून पापें घडलीं असलीं तर तीं जळून खाक होतील.

× × ×

## भगवंताचें आनंददायी स्मरण

या जगांत सदैव आनंद देणारी, माधुर्य वाढविणारी अशी एकतरी वस्तु आहे का ? रोज रोज तेंच तें करीत राहाणें, तें खाणें, तेंच तें वापरणें या साऱ्या गोष्टी पुन्हां पुन्हां दृष्टीसमोर आल्यानें किंवा अनुभवल्यानें त्यांचा एक दिवस कंटाळा येऊं लागतो. परंतु रोजच्या रोज वापरल्यानें आनंद देणारी अशी एकच गोष्ट या जगांत आहे. कोणती ती ? भगवंताचें स्मरण ! हें स्मरण कितीही करीत रहा. कंटाळा येणार नाहीं. जितकें मनोभावें तें कराल तितकी त्याची माधुरी वाढत जाईल. तितकी अधिकाधिक तुमच्या सुखांत भर पडत जाईल; परंतु आम्हीं किती पापी आहोंत ! भगवंताच्या नांवापासून आम्हीं दूर दूर राहूं इच्छितों, त्याची गोडी आम्हांला समजलेली नाहीं व आम्ही ती चाखून पहाण्याचा कधीं प्रयत्नही केलेला नाहीं !

× × ×

## गोडी वाटली पाहिजे

भगवंताचें नांव घेण्यांत गोडी वाटली पाहिजे. तें नांव घेतल्याबरोबर शरीर पुलकित झालें पाहिजे. तें नांव घेण्याचा कंटाळा वाटतां कामा नये, भार वाटतां कामा नये. ती सहज व स्वाभाविक गोष्ट घडली पाहिजे. कधी कधीं सुखाच्या लालसेनें त्याची आठवण आपण करतों, नाहीं असें नाहीं. परंतु हें खालच्या दर्जाचें स्मरण होय. भगवंताचें भजन केल्याशिवाय मी राहूं शकत नाहीं. तेंच माझा जीवनाधार. सारी गोडी त्यांत वाटूं लागली पाहिजे. भजन हा स्वभावधर्म बनला पाहिजे. देवाचें नामस्मरण करण्यांत गोडी वाटल्याशिवाय त्यांतील गोडी समजणार नाहीं. रुची वाटूं लागली हें समजायचें कसें ? त्या नामस्मरणाबरोबर सारें शरीर रोमांचित झालें पाहिजे. तन्मयता प्राप्त झाली पाहिजे. डोळ्यांतून अश्रुधारांचा मंगल प्रवाह सुरू झाला पाहिजे.

× × ×

## भजनानंद

भगवंताचें स्मरण, त्याचें नामसंकीर्तन किंवा त्याचें भजन, आमच्यांत नसली तरी माणुसकी निर्माण करतें. आमच्यांतील दानव किंवा सैतान आस्ते आस्ते, आपो-

# संत समागम गोड

## " गणू, बऱ्या बोलानें नोकरी सोडून दे. "

बाबांचे निस्सीम भक्त ह. भ. प. श्रीदासगणू महाराज त्यांच्या आयुष्याच्या पूर्वार्धात पेशानें पोलीस शिपाई होते. त्यांनीं आपल्या नोकरीचा आरंभ श्रीगोंद्यास केला. येथील श्री. आवाशास्त्री भणगे या वृद्ध विद्वान् गृहस्थाकडील कांहीं पुरातन संस्कृत ग्रंथांचें संशोधन करण्यासाठीं सरकारी अधिकारी म्हणून श्री. वामनशास्त्री इस्लामपूरकर आले होते, त्यांची व्यवस्था सरकारकडून करण्यांत आली असल्यामुळें त्यांच्या तैनातीस श्रीदासगणूंना देण्यांत आलें होतें. श्रीवामनशास्त्र्यांच्या सहवासांत असतांना त्यांचें सदाचरण, प्रशांत वृत्ति, सरळ स्वभाव पाहून श्रीदासगणू त्यांच्याकडे आकर्षिले गेले आणि परमार्थाला अवश्य असलेला गुरुपदेश घ्यावयाचा तो याच सत्पुरुषाकडून, असा त्यांचा निश्चय झाला.

## गुरुदक्षिणा देण्याचा विचार

शास्त्रीबुवांचें श्रीगोंद्याचें काम संपण्याचेवेळीं श्रीदासगणूंनीं आपणांस उपदेश देऊन कृतार्थ करण्यासाठीं त्यांच्याजवळ हट्टच धरला. दासगणूंचा निग्रहाचा भाव पाहून श्रीवामनशास्त्र्यांनीं त्यांना गुरोपदेश केला. गुरुदक्षिणा म्हणून एक महिन्याचा पगार उपदेश घेतांना पुढें ठेवावा अशी दासगणूंची इच्छा होती; पण श्रीवामनशास्त्री यांनीं त्यांना घरीं जाऊं दिलें नाहीं. 'अरे, एका पगारानें काय होतें? गुरूला सर्वस्व अर्पण करावें लागतें. तशी तयारी आहे का? जाऊं दे. तुझ्या सर्व नोकरीचीच मी गुरुदक्षिणा घेणार आहें; पण त्याला अवकाश आहे. कडोसरीला दोन पैसे आहेत ना? तेवढे सध्यां पुरेत.' असें ते म्हणाले.

ही नोकरीची गुरुदक्षिणा श्रीवामनशास्त्र्यांनीं दासगणूकडून श्रीसाईबाबांकरवीं कशी घेतली याची हकीकत फारच मजेशीर आहे.

## बाबांचें विभूतिमत्व

पुढें शास्त्रीबुवा देह ठेवण्यासाठीं काशीस निघाले. भुसावळ स्टेशनपर्यंत दासगणू त्यांच्याबरोबर होते. तेथून त्यांना परतवितांना शास्त्रीबुवांनीं त्यांचें सांत्वन करीत म्हटलें, 'वेड्यासारखें दुःख करूं नकोस. हा मुळीं मृत्युलोकच आहे. त्यांतूनही मी नित्याचाच दुरावला आहे अशी समजूत करून घेण्याचें कारण नाहीं. दोन तीनदां शिरडीस गेला होतास ना? श्रीसाईबाबा योग्य विभूति आहेत. त्यांना माझेंच स्वरूप मान. आम्ही दोघे एकरूप आहोंत. तेच येथून पुढें तुला वेळोवेळीं मार्ग दाखवितील.'

त्याप्रमाणें दासगणू पुढें श्रीसाईबाबा यांना गुरुस्थानीं मानूं लागले. त्यांच्या आज्ञेप्रमाणें संतचरित्रें लिहिण्यास प्रारंभ झाल्यानंतर श्रीदासगणू बाबांच्या दर्शनाकरितां बराच वेळ जात असत. बाबांविषयीं त्यांच्या मनांत आदरभाव उत्पन्न झाला होता. श्रीसाईबाबांनेंही दासगणूंवर फार प्रेम होतें. बाबा रागावले म्हणजे मशिदीची पायरी चढण्याचाही कोणाला धीर होत नसे. दासगणू तशा स्थितींत जवळ जाऊन नमस्कार करीत. त्यांना पाहिलें कीं बाबांचा राग नाहींसा होई व ते त्यांच्याशीं हितगुज करूं लागत. जणूं काय ते बाबांचे प्रल्हाद होते.

## नोकरी सोडण्याचा आग्रह

'नोकरी सोडून दे रे गणू' असा आग्रह बाबा दासगणूंना करूं लागले. दासगणू त्यांच्या दर्शनाला आले कीं ते म्हणत, 'गणूं नोकरी सोडून दे. अरे आपण बूट पुसायला जन्मलों काय? आपण कोणाचे चाकर होऊं नये.'

दासगणू म्हणत, 'बाबा, कोणाचा आधार नाहीं. ही नोकरी आहे म्हणून दोन प्रहराला गोळाभर अन्न तरी खायला मिळतें. मी आतां फौजदारीच्या परीक्षेस बसलों आहे. यश मिळालें तर बढती होईल; तेव्हां 'परीक्षेंत उत्तीर्ण होशील,' असा आशीर्वाद देण्याचें टाकून 'नोकरी सोड' असा भलताच आग्रह कां बाबा?'

'तूं कसचा परीक्षेंत उतरतोस? माझें ऐक. नोकरी सोड. देवाला तुझी लई काळजी आहे!'

दासगणू फौजदारीच्या परीक्षेंत वरच्या वर्गांत पसार झाले तरी पण बाबा म्हणाले, 'कागदावर पास होण्यांत काय अर्थ? फौजदारी मिळवशील तेव्हां खरा! माझें ऐक. नको या मोहांत पडूं. नोकरी सोड गणू!'

## किती तोंड चुकविशील?

चांदोरकरांनींहि दासगणूस बाबांच्या सांगण्याप्रमाणें करण्यास सांगितलें; तरी दासगणूंनीं तें दुर्लक्षिलें. इतकेंच नव्हे; तर त्या त्रासानें शिरडीस जाण्याससुद्धां ते टाळूं लागलें. एकदां गुन्ह्याच्या तपासाकरतां शिरडीवरूनच रस्ता होता; पण आडवाटेनें जात असतांनाहि बाबांची अकस्मात भेट झाली. ते म्हणाले, 'गणू, किती तोंड चुकवशील? बऱ्या बोलानें नोकरी सोडून दे. ऐकलें नाहींस तर पस्ताव्यांत पडशील बरें!' बाबांच्या या बोलण्यावर कांहींच उत्तर न देतां नमस्कार करून दासगणू पुढें निघून गेले.

पुढें कांहीं दिवसांनीं श्रीनरसिंगजी महाराजांची माहिती मिळविण्याकरितां दासगणू नेवाशाहून अकोटास अधिकृत रजा नसतांना फिरतीवर असतांनाच परभारें निघून गेले. इकडे त्यांच्या हद्दींत सातेगांव मालगांव येथें मोठा दरोडा पडून त्यांत गांवांतील मारवाडी ठार होऊन सात आठ हजारांचा माल चोरीस गेला. पोलीसांची

धांवपळ सुरू झाली. जमादार मात्र ठाण्यावर नाहीं. दासगणूवर ठपका आला. अकोटाहून माघारीं आल्या नंतर त्यांना ही हकीकत समजली. 'परमेश्वर करील तें खरें' असें म्हणून ते कापूस वडगांवास जाण्यास निघाले. बाबांनीं दिलेली धमकी त्यांना आठवली व त्यांची अवज्ञा केल्यानेंच हें संकट आपणांवर कोसळलें आहे ह्याची त्यांना जाणीव होऊं लागली. वाटेंत गोदावरी लागते तेथें रात्रीच्या दीडच्या-सुमारास ते येऊन पोहोचले. नदींत उमें राहून त्यांनीं ओंजळींत पाणी घेतलें व शिरडीकडे तोंड करून ते म्हणाले, 'बाबा यांतून सुखरूप पार पडलों तर मी नोकरी सोडीन. याला गंगाबाईचीच साक्ष' असें म्हणून त्यांनीं पाणी सोडलें व तें पुढें निघून गेले.

## अजून तरी डोळे उघड

पुढें दासगणूना ते दरोडेखोर अवचित सांपडले. अधिकाऱ्यांचा त्यांच्यावरचा राग नाहींसा होऊन त्यांनीं त्यांच्या बढतीसाठीं शिफारस केली. बढतीची आशा उत्पन्न झाल्यावर नोकरी सोडणें जिवावर येणें स्वाभाविकच होतें. शिरडीस आल्यावर बाबांनीं त्यांना इटकलेंच, "गणू, गंगेत शपथ कोणी वाहिली नोकरी सोडीन म्हणून ? अजून तरी डोळे उघड." पण दासगणूंनीं तिकडे दुर्लक्ष केलें.

नंतर एका प्रसंगांत दासगणू खरोखरीच कायद्याच्या कचाट्यांत सांपडण्याची वेळ आली. गुन्ह्याच्या तपासासाठीं आरोपीस वागवितांना मुळांत अनैतिक नव्हे, पण कायद्याच्या कक्षेबाहेरचें वर्तन झालें. हितशत्रूंनीं या संधीचा फायदा घेऊन काहूर उठविलें. शिक्षा होऊन नांवाला बट्टा लागतो कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. दासगणू त्वेनें शिरडीस गेले आणि बाबांना म्हणाले, 'मागच्या प्रकरणीं माझ्याकडे चूक होती तरी मला वांचविलेंत आणि आतां मी निरपराधी असूनसुद्धां शिक्षा देवविणार काय ? तुमच्या पायाशपथ सांगतों, डाग न लागतां सुटलों तर लगेच नोकरी सोडीन.' बाबांच्या कृपेनें खरोखर तसें घडलें. चौकशींत दासगणू पूर्ण निर्दोषी ठरले.

## फकिराचा नाद सोड

यानंतर मात्र दासगणूंनीं नोकरी सोडण्याचा निश्चय करून राजीनामा पाठविला. राजीनामा दोनतीन महिने संमतच होईना. वरिष्ठ साहेबानें समक्ष बोलावून 'वेड्या-सारखें करूं नको. अजून राजीनामा परत घे. फकीराच्या नादीं काय लागलास ! आपल्या पुढच्या आयुष्याचा कांहीं विचार करशील कीं नाहीं ?' इत्यादि सांगून समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. स्नेही सोबत्यांनींही तीव्र विरोध दर्शविला. पण कशाचाही उपयोग झाला नाहीं. करारी माणसाचा विचार ठरेपर्यंत अवकाश लागतो. एकदां निश्चय झाल्यावर मग त्याला मागें वळविणें हें त्याला धबधब्यावरून कोस-ळणाऱ्या प्रवाहाला मागें फीर म्हणून सांगण्यासारखेंच आहे.

**बाबांचें आश्वासन**

नोकरी सोडून दासगणू शिरडीस आले. नोकरी सोडली. आतां आपलें पुढें काय? ही विवंचना मागें होतीच. त्यांना काळजी लागलेली पाहून श्रीसाईबाबा म्हणाले, 'गणू, देव पाठीराखा असतांना चिंता कसली करतोस? नांदेडकडे जा. तेथें मी तुझी सर्व व्यवस्था केली आहे.'

'बाबा, हें नांदेड कोणतें? पुण्याजवळचें कां?

'छे! तें नाहीं. वसमत नांदेड तिकडे जालन्याच्या खालीं आहे. तिकडे जा.'

श्रीसाईबाबांची आज्ञा शिरसावंद्य मानून दासगणू प्रथमच मोंगलाईत आले. त्यांचा 'संतकवि' असा जो लौकिक झाला तो याच प्रांतांत. संतरत्नांची खाणच असलेल्या अशा या मराठवाडा प्रांतांतील वातावरण दासगणूंच्या मनःप्रवृत्तीस चांगलेंच मानवलें.

मधुर फळझाडें देणाऱ्या फळझाडांची रोपें एके ठिकाणीं तयार करून मग दुसरीकडे रुजवितात म्हणजे तीं मग फळांफुलांनीं बहरून जातात. तीं अनेक श्रांतांना आपल्या छायेंत सुखशीतल विश्रांति देऊन त्यांचा श्रमपरिहार करतात. मधुर रसानें त्यांना तृप्तवितात. श्रीदासगणूंच्या जीवनाचें तसेंच झालें. नगर प्रांतात अंकुरित झालेलें त्यांच्या अध्यात्मिक जीवनाचें रोप मराठवाड्याच्या पवित्र सुपीक भूमींत चांगलेंच रुजलें, वाढलें आणि त्याला अनेकांना विसावा देईल अशा मधुर फळें देणाऱ्या आम्रवृक्षाची विशालता प्राप्त झाली. बाबांच्या कृपेनें दासगणूंना चिंता करण्याचें कांहींच कारण राहिलें नाहीं.

---

MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

माटुंगा क्लीनिंग वर्क्स

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ ( मालक : एस्. व्ही. प्रधान

# श्रीगुरुग्रंथांतील नामदेवांची वाणी

अनुवादक : **गणेश विष्णु कविटकर**, एम्. ए.

: ४३ :

हे देवराया! हंसत खेळत मी तुझ्या मंदिरांत किती प्रेमानें आलों; पण तुझी भक्ति करीत असतांच माझे हात पकडून मला (पुजाऱ्यांनीं) उठवलें. यादवराया! मी जातीनें हीन आहे. (पुजाऱ्याकडून माझी अशी अवहेलना होणार होती तर मग) आपण मला शिंप्याच्या जातींत कां जन्म दिला? मी आपली छोटी कांबळ घेऊन उलट दिशेनें चालूं लागलों आणि देवळाच्या पिछाडीला जाऊन बसलों. नामदेव म्हणतात, जों जों मी हरिगुणकीर्तन करूं लागलों तों तों देवळाचें तोंड भक्तजनाकडे फिरूं लागलें.

: ४४ :

भुकेलेल्या मनुष्यास ज्याप्रमाणें अन्न प्रिय असतें, तृषावंताचा हेतु पाण्यानें विनामोल साध्य होतो म्हणून त्याला ज्याप्रमाणें पाण्याची उत्कंठा असते किंवा मूढ मनुष्य ज्याप्रमाणें कुटुंब सेवेंत रमलेला असतो त्याप्रमाणें प्रभु नारायणाच्या प्रेमांत नामदेव गढून गेला आहे. सहजासहजीं कल्याणकारक असें वैराग्य त्याला प्राप्त झालें. ज्याप्रमाणें कामयुक्ता स्त्री परपुरुषावर आसक्त होते किंवा लोभी मनुष्य धनाचा लोभी असतो अथवा विषयी पुरुषाला कामिनी प्रिय वाटते, त्याप्रमाणें नामदेवाला प्रभु मुरारी प्रिय वाटतो. परमेश्वराचें प्रेम जीवास लागून राहिले आहे. गुरुकृपेनें संशय नाहींसा झाला आणि कधींहि न तुटणाऱ्या, कधींहि न आटणाऱ्या प्रेमांत मी सामावून राहिलों आहे. आईचें प्रेम तिच्या लहान मुलावर असतें तसें माझें मन श्रीहरीच्या ठिकाणीं अनुरक्त झालें आहे. नामदेव म्हणतात, मला देवाचें प्रेम जडलें आणि तो प्रभु गोविंद माझ्या हृदयांतच वास करीत आहे.

: ४५ :

कामांध पुरुष घरांतील बायकोचा त्याग करून परस्त्रीशीं संबंध ठेवतो. शिवरीच्या झाडाचीं फुलें पाहून पोपट त्यास बिलगतो, चोंच मारतो आणि चोंच अडकून त्यांतच त्याचा अंत होतो. त्याप्रमाणें पापी अगर कर्मनष्ट मनुष्याचें घर अग्नींत जळत असतें. त्यावर जलसिंचन करून तें कोण विझविणार? व त्यास वर कोण काढणार? ज्याठिकाणीं देवाची भक्ति केली जाते तिकडे तो ढुंकूनहि पाहात नाहीं. सन्मार्ग सोडून तो कुमार्गानें जातो. मूलतत्व विसरल्यामुळें तो जन्ममरणाच्या येरझारा घालीत राहतो. अमृतपान सोडून तो विषाचें सेवन करतो. ज्यावेळीं नर्तकी आखाड्यांत

उतरते त्यावेळीं ती सुंदर वस्त्रें परिधान करते, शृंगार करते. पूर्ण तालांत आणि उंच स्वरांत गाणें गात तिचें नर्तन चाललेलें असतें. परंतु तिच्या मानेभोंवतीं शत्रूनें आपले पाश पसरलेले असतात. ( हें तिच्या गांवींहि नसतें ) त्यांच्या कपाळीं हेंच लिहून ठेवलें आहे त्यांनीं श्रीगुरुदेवाला शरण जाऊन भक्ति करावी. नामदेव म्हणतात, हाच विचार साधुसंतांनीं केला आणि ते संसार सागर तरून गेले.

: ४६ :

एके दिवशीं प्रल्हादाचा शिक्षक संदामर्क यानें हिरण्यकश्यपूकडे जाऊन तक्रार केली, "तुमचा मुलगा शिकण्याकडे लक्ष देत नाहीं ! मी थकून गेलों आहें. तो हातांनीं टाळ्या वाजवितो, रामनामाचा जप करतो आणि मनांत हरीचें स्मरण करतो. त्यानें सर्व विद्यार्थ्यांना बिघडवून टाकले आहे. पट्टराणीनें विनंति करून म्हटलें कीं, हे प्रल्हादा ! राजानें ( हिरण्यकश्यपूनें ) सर्व नृपतींना जिंकून पृथ्वी अंकित केली आणि तूं पुत्र असूनहि त्यांचें ऐकत नाहींत ? तूं तर दुसऱ्याच मार्गाचा अवलंब करीत आहेस.'

हिरण्यकश्यपूनें तपश्चर्या करून दीर्घायुष्य मिळविलें होतें. त्यानें दुष्ट मंत्र्यांच्या मसलतीनें प्रल्हादाचा कडेलोट केला, समुद्रांत बुडविलें, अग्नींत फेकिलें तरी ईश्वरानें त्याचें भयापासून रक्षण केलें. हें पाहून हिरण्यकश्यपूनें कालासहि भय उत्पन्न करणारे आपलें खड्ग बाहेर काढलें आणि क्रोधयुक्त होऊन तो प्रल्हादास म्हणाला, 'या शस्त्रापासून तुझें कोण रक्षण करतो तें दाखव.' प्रल्हादानें उत्तर दिलें, "तिन्ही जगाचा स्वामी असा पीतांबरधारी प्रभु या खांबांत आहे." यावर ईश्वर नरसिंहाच्या रूपानें खांबांतून प्रगट झाला. त्यानें हिरण्यकश्यपूस तीव्र नखांनीं फाडून टाकलें आणि देवदानवांना सुखी केलें. नामदेव म्हणतात, त्याच अभयपद देणाऱ्या रामरूपी नरहरीचें मी ध्यान करीत असतों.

---


## लहान मुलांच्या आंकडीवर

### जुनें आणि प्रसिद्ध औषध

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# संतांचें स्वरूप व कामगिरी

साधुसंत किंवा ज्यांनीं वेगवेगळ्या मार्गांनीं जाऊन भगवंताला प्रसन्न करून घेतलें आहे, अशा श्रेष्ठ विभूति सर्व जगांत आढळून येत असल्या तरी भारत त्याबाबतींत एक आगळा देश आहे. आगळा या दृष्टीनें कीं, या देशांत संतांची समृद्धि किंवा विपुलता ज्या प्रमाणांत आढळून येते तशी ती जगांतील इतर कोणत्याही देशांत आढळून येणार नाहीं. जगाच्या आरंभापासून किंवा जेथें इतिहासाचा ठावठिकाणा लावतां येत नाहीं त्या अनादि काळापासून त्या दृष्टीनें ईश्वर या देशावर आपल्या कृपाप्रसादाचा वर्षाव करीत आलेला आहे. आणि आजतागायत ती परंपरा अखंड चालू आहे.

ज्यांनीं आम्हांला वेदमंत्र व उपनिषदें यांचा अमूल्य ठेवा दिला ते कोण बरें होते ? ज्यांनीं भगवंताला प्रसन्न करून घेतलें असे ते ऋषी-मुनी व कवीही होते. त्यांना अध्यात्माचा ठाव लागलेला होता.

## संतांनीं काय शिकविलें ?

उपनिषदांतून ज्यांनीं थोर तत्त्वांचा आविष्कार केला, स्वानुभवाचें ज्ञान ग्रथित केलें ते याज्ञवल्क्य व उद्दालक हे तरी कोण होते ? तेही साधुश्रेष्ठच होते नाहीं का ?

महाभारत, रामायण व पुराणें ज्यांनीं रचिलीं त्यांचा मुख्य उद्देश कोणता बरें होता ? असत्यावर सत्याचा विजय करून सज्जनांनीं या जगांत सद्गति मिळविली व दुर्जन देशोधडीस लागले. या जगांत सत्य हेंच शाश्वत आहे. सत्प्रवृत्तीच जगांत यश मिळवूं शकतात हेंच त्यांनीं परोपरीनें मनावर ठसविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

अवतार हें तरी काय प्रकरण आहे ? या जगांत अवतार कशासाठीं होतात ? श्रीकृष्णानें गीतेंत स्पष्ट सांगून टाकिलें आहे कीं, '**परित्राणाय साधूनाम्, संभवामि युगे युगे**' या जगांत जेव्हां साधुसंतांचा, सज्जनांचा छळ होऊं लागतो, सत्प्रवृत्ति पायांखालीं तुडविल्या जातात व दुष्ट प्रवृत्तीं वर येऊं लागतात, त्यावेळीं मी कोणत्या ना कोणत्या रूपानें अवतार घेऊन या जगतीतलावर येत असतों.

सतींना संतांना जरि कधिं जगीं दुष्ट छळिती ।
तयांना रक्षाया अवनिवरि ये मी रघुपती ॥

'विनाशायच दुष्कृताम्' दुष्टांचा नाश करणें व सज्जनांचें रक्षण करणें हेंच माझें ब्रीद आहे.

### अध्यात्म व धर्म

अध्यात्म काय किंवा धर्म काय, भारतांत त्यांची एकमेकांपासून फारकत झालेली नाहीं. अध्यात्मवादी व धर्मनिष्ठ या देशांत वेगवेगळे नाहींत. तत्त्वज्ञ व धर्मनिष्ठ या दोन्हीं गुणांनीं सालंकृत असे संत येथें नांदले.

ज्यांनीं निरनिराळ्या तत्त्वांना एका सूत्रांत किंवा एकत्र आणण्याचें महत् कार्य पार पाडिलें ते थोर सूत्रकार कोण होते? ते ऋषी होते. नैय्यायिकांनींही मनुष्याच्या ठायीं असलेल्या अध्यात्म गुणांची वाढ व विकास होत गेला पाहिजे असें सांगितलें. शंकराचार्य, रामानुज किंवा माधव हे तत्त्वज्ञानी होते, तसेच संतही होते. बुद्ध धर्मात व जैन धर्मातही त्या त्या धर्मांचें तात्त्विक विवरण करणारी एकेक संतमालिकाच आपणांस आढळून येईल.

ज्यांनीं देशभर व प्रांतोप्रांतीं भक्तीचा प्रचार केला, भक्तीबळानें परमेश्वर प्राप्त होते असें सांगितलें ते संतच होते. त्यांनीं परब्रह्म प्राप्त करून घेतलें होतें. आणि तेंही भक्तिमार्गानें प्रवास करून.

या देशांतील कांहीं भागांतून सामाजिक सुधारणांस चालना देणारे व जनतेच्या विचारांस कलाटणी देणारे संत होते.

### राजकारणी संत

रामदास व विद्यारण्य यांनीं राजकारणही हाताळलें आणि ते संत होते.

या भारताला परकीय सत्तेच्या जोखडांतून मुक्त करणारा व देशाला स्वातंत्र्याचा लाभ करून देणारा आपला थोर पुढारी कोणत्या गुणांनीं अलंकृत झालेला होता?

तेव्हां सांगायचें काय? जगाचा सारा इतिहास तुम्हीं धुंडाळून पहा. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत जें जें महत्वपूर्ण असें घडून आलें तें संत मालिकेत ज्यांची गणना करतां येईल अशा थोर विभूतीमुळेंच होय, अशी ही संतांची अखंड धारा अनादिकाळापासून वाहत चालली आहे.

बरें, येथें जात गोत, लिंगभेद सामाजिक दर्जा वगैरे कांहींही आड येत नाहीं. संत अमुक जातींत, अमुक वर्गांत किंवा अमुक परिस्थितींत आढळून यावयाचा असा कांहींच प्रकार नाहीं. श्रेष्ठ, कनिष्ठ, हलका या क्षुद्र विचारांस तेथें थाराच नाहीं. अगदीं हासभास नसलेल्या स्थानीं व अत्यंत कनिष्ठ समजल्या-गेलेल्या व गरीबांत गरीब जातींत संतांचा उद्भव झालेला आपणांस आढळून येईल.

आणि श्रीमंत वर्गांत संत झाले नाहींत म्हणतां? जेथें सुसंपन्नता आहे तेथें साधुत्व नांदणें दुर्लभ! परंतु त्या वर्गालाही संतांनीं पुण्यपावन केलें आहे.

### स्त्रियांतही संत झाले

आणि स्त्रियांचें काय? स्त्रिया म्हणजे नाना प्रकारच्या बंधनांनीं जखडलेल्या!

किती निर्बंधांत त्यांना वावरावें लागत असतें ? आजचा काळ मध्ययुगीन काळाच्या दृष्टीनें कितीतरी पुढारलेला आहे. आज तीं पूर्वींचीं बंधनें शिथिल झालेलीं आहेत. त्यांच्या सभोंवार उभारलेल्या त्या भिंती आज जमीनदोस्त झालेल्या आहेत. परंतु पूर्वींच्या त्या बंधनाच्या काळांतही साधुत्व व संतपण स्त्रीवर्गापर्यंतही जाऊन पोहोंचलें होतें. त्या संतपणावर कोणीही मात करूं शकला नाहीं किंवा त्या वृत्तीला दबावूं शकला नाहीं ! देवाचा ध्यास लागल्यावर मग काय ? स्त्रियाही त्या ध्यासापायीं सारीं बंधनं पायाखालीं तुडवून पुढें सरसावल्या व त्यांनीं त्या काळावर व परिस्थितीवर मात करून दाखविली !

साधुत्वाचा, संतपणाचा हा एक फार मोठा गुण आहे. कोणता गुण ? त्याच्या-ठायीं, मग तो पुरुष असो वा स्त्री असो कणखरपणा व एकप्रकारचें असामान्य सामर्थ्य निर्माण होत असतें. तें सामर्थ्य कोणालाही आटोक्यांत आणतां येत नाहीं किंवा दबवून टाकतां येत नाहीं. जेव्हां एखादा पुरुष किंवा स्त्री अध्यात्मबळानें अलंकृत होतो अर्थात् ज्याच्यावर ईश्वरी कृपेची छाया पडते तो किंवा ती तुमची बंधनें आणि तुमचे रीतिरिवाज कांहीं मानीत नाहीं. ते तडाड तोडून टाकण्याचें आत्मबल आपोआप त्याच्या ठायीं आलेलें असतें. नारदमुनींच्या भक्तिसूत्रांत यासंबंधीं अत्यंत सुंदर वर्णन आलेलें आहे. देवाचे थोर भक्त जे असतात ते आपलें सारे कुटुंब, सभोवारचें सारें वातावरण व ही पृथ्वी पवित्र बनवून टाकतात. त्यांचें तेजच तसें प्रखर व पवित्र असतें. त्यांच्यामुळें त्यांच्या वास्तव्याचीं स्थानें पुण्यक्षेत्रें बनतात व त्यांचा शब्द म्हणजे ब्रह्मवाक्य बनत असतें. जन्मामुळें, विद्वत्तेमुळें, व्यवसायामुळें, दारिद्र्यामुळें किंवा संपन्नतेमुळें, कशाहीमुळें त्यांच्या वागण्यांत व बोलण्यांत अडथळा येत नाहीं. त्यांना कोणीही आडकाठी करूं शकत नाहीं.

## संतांना सर्व सारखे

ज्याच्यावर दैवी कृपा झाली तो संत गरीब, श्रीमंत, कुष्ठ रोगी किंवा कोणत्याही दुर्धर रोगांनीं पिडलेला माणूस असो, त्याची सेवा करण्यांत त्याला आनंदच वाटेल. त्याच्या नजरेंत सर्व सारखे. सारीं आपलीं भावंडे आहेत असें त्याला वाटूं लागतें.

गीतेंत सांगितलें आहे कीं, जो खराखुरा शहाणा वा पंडित आहे, त्याला समदृष्टि प्राप्त झालेली असते. त्याच्यापुढें विद्वत्तेनें वाकलेला ज्ञानी, एखादी गाय, हत्ती, कुत्रा किंवा मांजर हीं सारीं त्याला सारखींच वाटतात. संत हे एका देशापुरतेच नसतात. ते साऱ्या जगाचे असतात. जग त्यांचेंच आहे. अखिलमानव जात त्यांना आपलीच वाटते. त्यांच्याठायीं दुजाभाव, परकेपणा मुळींच नसतो. तेथें सारा व्यापकपणा, आकुंचित भावनेला तेथें तिळभरही जागा नसते.

भक्तिमार्ग व ज्ञानमार्ग असे आपण दोन वेगवेगळे मार्ग समजतों; परंतु खरें पहातां ते दोन्हीं एकमेकांपासून भिन्न नाहींत. ज्ञानयोगी, भक्तियोगी असे भेद पाडले जातात तसेच राजयोगी व कर्मयोगी असेही प्रकार आपल्यापुढें आहेत. कोणी कोणत्या मार्गाचा तर कोणी दुसऱ्या कोणत्या तरी मार्गाचा पुरस्कार केल्याचें आढळून येतें; परंतु या सर्वांचें ध्येय असतें एकच–ईश्वर प्राप्ति.

राजयोगी कोणाला समजतात? पातंजली योगसूत्रांत सांगितल्याप्रमाणें त्या मार्गानें जे जातात ते. ध्यानधारणा व एकाच वस्तूंवर मनाचें केंद्रीकरण करावयाचें, तसा अभ्यास करावयाचा मनावर संपूर्ण ताबा मिळवावयाचा व तो कसा मिळवावयाचा हें त्या योगसूत्रांत सांगितलें आहे. त्या मार्गानें जाणारे ते राजयोगी. आणि कर्मयोगी? कर्मयोगी जें जें कांहीं करतो तें कोणत्याही प्रकारची आस्था न बाळगतां निःस्वार्थपणें केवळ ईश्वरासाठीं म्हणून करीत असतो. त्याला त्या कर्मापासून कोणत्याही प्रकारचा फायदा संपादन करावयाचा नसतो. जें जें करावयाचें तें ईश्वरार्पण या भावनेनें तो वावरत असतो. त्यांत त्याचा स्वार्थ बिलकूल नसतो. त्याच्या ठायीं मी करतों हा किंवा दुसरा कोणत्याही प्रकारचा अहंकार नसतो. परिणामाबद्दलही त्यांना फिकीर नसते. ईश्वर मर्जीनुरूप काय तें घडवील. त्याच्यावर सारा भरिभार. आपण नामानिराळे ही असते त्यांची वृत्ति. त्यांचें जीवन म्हणजे समर्पित व निःस्वार्थ जीवन असतें.

**संतांचे मार्ग विविध परंतु ध्येय एकच**

तेव्हां ज्यांना आपण साधू किंवा संत या संज्ञेनें ओळखतों त्यांमध्यें हे सारे प्रकार येतात. यापैकीं कोणता ना कोणता मार्ग त्यानीं आचरिलेला असतो. त्यांनीं अध्यात्म, तें परब्रह्म प्राप्त करून घेतलेलें असतें. शुकासारखे ज्ञानयोगी, नारदासारखे भक्तियोगी, विश्वामित्रासारखे राजयोगी व राजा जनकासारखे कर्मयोगी या भरतखंडांत होऊन गेले; परंतु ते केवळ त्या त्या एकाच तत्वाचे पुरस्कर्ते होते असें मात्र नाहीं. शुक ज्ञानमार्गी होते तरी ते भक्त नव्हते का? नारद भक्तिमार्गी होते तरी ज्ञानी नव्हते का? तसेंच विश्वामित्र व जनक यांच्या बाबतींतहि म्हणतां येईल व म्हणणें रास्तहि होईल. त्या सर्वांच्या ठायीं ज्ञान, भक्ति, सेवाभाव व आत्मसंयम परिपूर्णतेनें वास करीत नव्हता काय?

आतां आपण थोडे चमत्काराकडे वळूं या. चमत्कारांशिवाय नमस्कार नाहीं म्हणतात. जेथें चमत्कार करून दाखविण्याचे सामर्थ्य आहे तेथें संतपण किंवा साधुत्व आहे अशी सर्वसाधारण श्रद्धा किंवा भावना आहे. कांहीं संतें चमत्कार करून दाखवितात व जगाच्या कल्याणासाठीं, वृत्तीपालट होण्यासाठीं कांहीं संतांनीं चमत्कार करून दाखविले आहेत; परंतु कोणीही संत चमत्कारांस

मुळींच महत्व देत नाहीं. हा सिद्धीचा प्रभाव आहे. चमत्कार आढळून येतील तेथेंच संतपणा असतो व इतरत्र तो नाहीं असें म्हणणें चुकीचें ठरेल. अध्यात्ममार्गाच्या पायऱ्या चढत असतां सिद्धी प्रसन्न होतात. वाघ, सिंहासारख्या हिंस्र जनावरांस जवळ घेऊन थोपटतां येतें, विषारी सर्पांचें वीष पचवितां येतें, लोखंडाचें सोनें करतां येतें, अदृश्यपणें या जगांत कुठेंही जातां येतां येतें, पाण्यावरून चालत जातां येतें, पेटत्या अग्नींत प्रवेश करूनही अग्नीचा दाह सहज सहन करतां येतो, परकाया-प्रवेश करतां येतो. अखंड तारुण्य उपभोगणें शक्य होतें; आणखी काय ? सिद्धी प्राप्त झाल्यानें काय वाटेल तें करतां येतें. परंतु अध्यात्ममार्गांत त्यांना महत्त्व नाहीं. सर्वसाधारण लोकांवर अशा चमत्कारांचा परिणाम होतो त्यामुळें त्यांना अध्यात्माची गोडी वाटूं लागतें एवढेंच.

## संत म्हणजे करुणासागर

ध्यान धारणेच्या व भक्तिभावाच्या रुपानें सत्पुरुष जें कांहीं संपादन करतो तें प्रेमभावाच्या रुपानें तो सर्वांना वाटीत असतो. सत्पुरुषांच्या ठायीं जें सद्गुणांचें संमेलन झालेलें असतें त्या सर्व सद्गुणांची राणी म्हणजे करुणा, सर्व प्राणिमात्रांच्या ठायीं दयाभाव वाटणें हीच होय. संतांचें अंतःकरण दयेनें व करुणेनें व्यापलेलें असतें. त्यांच्यासारखे उदार तेच. तेथें उच्चनीच, लहानमोठा हा भेदाभेद नसतो. सर्वांच्या सुखासाठीं ते झटत असतात. त्यांना कसलाच प्रपंच नसतो. मात्र दुसऱ्यांचा प्रपंच सुखासमाधानाचा व्हावा यासाठीं ते झटत असतात. आपल्याकडून सर्व भूतमात्रांची निरपेक्ष सेवा घडावी ही भगवंतापाशीं त्यांची प्रार्थना असते. भगवंता, तूं मला सेवेचें खंबीर साधन बनव हेंच त्यांचें मागणें असतें. आणि तसेंच त्यांचें वागणें. याचें कारण, एकच; त्यांच्या मनाची खात्रीं पटलेली असते कीं, देव हा केवळ देवळारावळांत नाही. तर त्याचें वास्तव्य सर्व प्राणिमात्रांच्याठायीं आहे. जेथें मजूर घाम गाळीत आहे, जेथें रोगी कण्हत कुंथत पडलेला आहे तेथें तो आहे. त्यांची सेवा म्हणजेच भगवत्सेवा. त्यांचा देव चतुष्पादांतही असतो. त्यांच्याबद्दलही त्यांचे अंतःकरण करुणेनें कासावीस होत असतें. एका गोमातेला कोणीतरी झोडपलें आणि ते वण बहिणाबाईच्या व तुकोबाच्या पाठीवर उठलेले आढळून आले ! प्राणिमात्रांतच काय परंतु निर्जीव वस्तूंतही संतांना देव दिसतो.

## परमेश्वर हेंच सर्वस्व

परमेश्वर हा संतांचा मध्यबिंदु असतो. त्या सभोंवार त्याचें सेवाचक्र फिरत असतें. त्यांना देव सर्वत्र दिसतो. हें सारें चराचर जग त्यानें व्यापलेलें आहे. आपण सभोंवार पाहातों ही त्याचींच नाना रूपें आहेत. त्या सर्वांची सेवा करणें हीच त्याची पूजा. त्यांना देवाशिवाय अन्य कांहीं दिसत नाहीं. त्यांचें नेत्र दुसरें कांहींच पाहूं शकत

नाहींत. ' जगाच्या कल्याणा । संतांच्या विभूति ' असें म्हटलें आहे तें उगाच नाहीं. संतांची दृष्टि इतकी विशाल व व्यापक झालेली असते. सर्वांच्या सेवेंत जीवन घालविणें हीच त्यांची इतिकर्तव्यता असते. ईश्वरी प्रेमानें सारें अंतःकरण व्यापल्यानंतर तेथें द्वेषाला व मत्सराला किंवा दुसऱ्या कोणत्याही दुर्गुणाला जागा कशी राहील ?

## द्वेषाला जागाच नाहीं

एकदां सुफी संत रबिया हिला एकानें सहज विचारलें कीं, ' तुझें देवावर प्रेम आहे कां ? '

' होय माझें देवावर प्रेम आहे ! '

' मग तूं सैतानाचा द्वेष करीत असशील नाहीं का ? '

' कां बरें द्वेष करीन ? नाहीं करणार ! कारण देवावरील प्रेमानें माझें अंतःकरण इतकें व्यापलें गेलें आहे कीं, तेथें द्वेषाला जागाच शिल्लक राहिलेली नाहीं ! '

हें ईशप्रेम एवढ्या थराला जाऊन पोहोंचत असतें की, जगांतील लोकांना तें वेड वाटूं लागते. रामकृष्ण परमहंस हे जगन्मातेवरील प्रेमानें इतकें भारले गेले होते की, सर्वत्र, सर्व स्त्रियांत त्यांना जगन्माताच दिसत असे व तसे ते वागत असत आणि त्यामुळें त्यांच्याच कुटुंबांतील वडीलधाऱ्या माणसांनीं त्यांची गणना कांही काळ वेड्यांत केलेली होती. आणि तें वेड घालवावें यासाठीं त्यांनीं रामकृष्णांच्या लग्नाचा घाट जुळवून आणिला ! परंतु तें त्यांचें दैवी वेड विवाहानंतर तरी थंडावले का ? जरासुद्धां थंडावलें नाहीं. तें थंडावण्यासारखें नव्हतेंच मुळीं. त्याऐवजीं तें वृद्धिंगत होत गेलें.

## उपनिषदें व गीता

उपनिषदांतून संत कोण व कसे असतात याचें वर्णन आलेलें आहे. ज्यानीं सत्याचा शोध लाविला व ज्यांना सत्याचे आकलन झालें, ज्यानीं सत्याचा संदेश ऐकिला व झेलला ते संत. मानवी अंतःकरणांत नाना प्रकारच्या इच्छा आकांक्षा घर करून राहिलेल्या असतात. त्यांच्यापासून जो मुक्त झाला तो संत. त्याला ब्रह्मपद मिळवितां येतें.

भगवद्गीतेंत भगवंतानीं साधूसंतांच्या ध्येयाचें वर्णन केलें आहे. तो स्थितप्रज्ञ असतो. गुणातीत असतो. भक्त असतो, योगी असतो व ब्रह्मभूत म्हणजे स्वयं ब्रह्म बनलेला असतो.

संत स्थितप्रज्ञ असतो. त्याचें मन स्वतःच्या ठायींच एकाग्र झालेलें असतें. त्याच्या इच्छा दूर पळालेल्या असतात. त्याला सुखाची किंवा दुःखाची बाधा बिल्कुल होत नाहीं. त्याचें मन संपूर्णपणें त्याच्या ताब्यांत असतें. त्याला मानाची, अपमानाची क्षिति नसते. त्याला सोनें आणि माती सारखींच वाटतात.

शत्रू आणि मित्र ही भावना त्याच्याठायीं नसते. त्याला प्रिय आणि अप्रिय असें कांहींच नसतें. त्यांचें सारें लक्ष असतें भगवंताकडे. तो दुसऱ्या कशाचीही पर्वा करीत नाही. त्याला सारें जग विष्णुमय झालेलें असतें.

खरा भक्त कोण ? ज्याला कोणाहीबद्दल द्वेषभाव वाटत नाहीं, जो सर्वांशीं मित्रत्वानें व प्रेमानें वागत असतो, जेथें मीपण लयाला गेलेलें असतें. सुख आणि दुःख जेथें सारख्याच मापानें मोजली जातात. क्षमाशीलता, समाधानता हे गुण तेथें सदैव वास करीत असतात.

## संत तुळसीदास

संत तुळसीदासानीं आपल्या 'रामचरित मानस' या ग्रंथांत श्रीरामचंद्राच्या तोंडीं संतासंबंधीं पुढील वाक्यें घातलीं आहेत. त्यांची येथें आठवण करून द्यावीशी वाटते. "संत इंद्रियांचे चोचले पुरविण्याकडे लक्ष देत नसतात. सारीं इंद्रियें त्यांच्या स्वाधीन असतात. त्यांची वागणूक सर्वांशीं प्रेमाची व सौजन्याची असते. दुसऱ्यांचें दुःख पाहून ते दुःखीकष्टी होतात व तें दुःख दूर करण्यासाठीं झटतात. दुसऱ्यांच्या आनंदानें त्यांना आनंद होतो. ते सर्वांकडे सद्भावानें पहातात. त्यांना जगांत शत्रू असा कोणी नसतो. त्यांच्याठायीं अहंकारास जागा नसते. तेथें थोतांड किंवा दांभिकपणा बिलकूल आढळणार नाहीं. त्यांनीं स्वास्थ्यावर व अधाशीपणावर जय मिळविलेला असतो. त्याचें अंतःकरण परदुःख पाहून दुःखी होते. त्यांची माझ्याठायीं संपूर्ण निष्ठा असते. त्यांना मानसन्मान नको असतो. तो इतरांनीं मिळवावा. तेथें आत्यंतिक नम्रता आढळून येईल. त्यांच्या तोंडून कठोर शब्द कधींही बाहेर पडणार नाहीं. त्यांना माझ्या पदकमळांशिवाय दुसऱ्या कशाची अपेक्षा नसते. तेंच त्यांचें सर्वस्व होऊन रहात असतें. आणि असे जे असतात तेच माझे प्रिय भक्त होत. त्यांच्यासाठीं मी वाटेल तें करण्यास बांधला गेलेला असतों.'

या आयुष्यांत प्रत्येकानें हेंच उच्च ध्येय पुढें ठेवून या जगांत वावरावयाचें आहे व तें संतपण संपादन करण्यासाठीं मनोभावें झटावयाचें आहे.

× × ×

'दहा भारतीय संत' या नांवाचा एक ग्रंथ इंग्रजींत डॉ. टी. एम्. पी. महादेवन् यांनीं लिहून तो भवान्स बुक युनिव्हर्सिटीतर्फे नुकताच बाहेर पडला आहे. त्याला लेखकानें लिहिलेल्या सुंदर उपद्घाताच्या आधारें हा लेख तयार करण्यांत आला आहे.

— आप्पाराव

———

# श्री साई शरणानंद यांचा अल्प परिचय

—पु. वा. कुलकर्णी

**श्री साई शरणानंद (पूर्वाश्रमींचे श्री. वामनराव पटेल सॉलिसीटर) हे गेलीं पन्नास वर्षें श्री साईबाबांच्या प्रेरणेनें गुजराथेंत लोकसेवेचें व श्री साई भक्तीच्या प्रचाराचें कार्य उत्तम प्रकारें करीत आहेत. बाबांचा सहवास ज्यांना लाभला अशा आज हयात असलेल्या भक्तांत त्यांचें स्थान मानाचें आहे.**

गेल्या अंकीं अभिवचन दिल्याप्रमाणें श्री साईबाबांचे एक निस्सीम भक्त व सध्यां अहमदाबाद येथें ज्यांनीं सर्वस्वी साईबाबांच्या सेवेला स्वतःस वाहून घेतलें आहे, असे श्री साई शरणानंद यांचा येथें अल्प परिचय करून देण्यांत येत आहे.

त्यांचें मूळ नांव वामनराव पटेल. त्यांचा जन्म १८८९ सालीं बारडोली तालुक्यांतील एका खेडेगांवीं झाला. त्यांचें घराणें सर्वसाधारण स्थितींतील असलें तरी तें शिक्षणांत पुढारलेलें होतें. त्यांचे आजोबा काय किंवा वडील काय व इतर नातलग मंडळी सरकारी नोकरींत होती.

## बालपणींच बाबांचें दर्शन

वयाच्या सातव्या किंवा आठव्या वर्षी आपल्या चुलत्याबरोबर श्रीसोमनाथच्या दर्शनासाठीं जाण्याचा सुयोग त्यांच्या आयुष्यांत जुळून आला. तेथें मंदिराबाहेर त्यांच्या नजरेस कोणी एक फकीर पडला. अनेकवेळां त्या भागांत त्यांचें दर्शन त्यांना घडलें. नंतर १९११ सालीं शिरडींत श्रीसाईबाबांचें त्यांना दर्शन घडलें त्यावेळीं सोमनाथ मंदिराजवळ भेटलेला फकीर म्हणजे श्रीसाईबाबाच होते असें त्यांना आढळून आलें.

वामनरावजींचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी झाला. त्यांचें सारें उच्च शिक्षण मुंबईंत झालें. १९१० सालीं ते एल्फिन्स्टन महाविद्यालयांतून बी. ए. च्या परिक्षेंत उत्तीर्ण झाले. व १९१२ सालीं ते सेकंड एल. एल. बी. झाले. लहानपणापासून त्यांना देव, धर्म, साधू संत यांची आवड व भक्तिभावाचें रोपटें वाढत चाललें होतें. १९११ सालीं त्यांच्या मनाला शिरडीस साईबाबांच्या दर्शनासाठीं जाण्याची ओढ लागली व त्याप्रमाणें ते गेले. तेथें त्यांचें मन अतिशय रमलें. त्यानंतर ते मधून मधून शिरडीस बाबांच्या दर्शनार्थ जाऊं लागले. त्यांना सालिसीटर व्हायचें होतें म्हणून एका सॉलिसीटर्स फर्ममध्यें दाखल होऊन तो उद्योग त्यांनीं सुरू केला. तेथें त्यांची नोकरीही चालू झाली होती. १९१३ सालीं कोर्टास उन्हाळी रजा पडल्यामुळें ते शिरडीस गेले. रजा संपतांच परत यावयाचें परंतु बाबांनीं त्यांना तेथून जवळ जवळ

वर्षभर हालूंच दिलें नाहीं. त्यांनी जाण्याची तयारी करावी व बाबांनीं त्यांना कांहीं ना कांहीं कारणानें परवानगी देऊं नये. त्यांच्या परवानगीशिवाय पाऊल पुढें कसें टाकावयाचें !

## डोक्यावर दगड कोसळला

मध्यंतरी कांहीं काल लोटला तरीही ज्या सॉलिसीटर्स फर्ममध्यें पूर्वी ते होते तेथें त्यांना पूर्वीची जागा मिळाली. नंतर १९१६ सालीं कांहीं ओळखीची मंडळी शिरडीस जात असल्याचें समजून बाबांना हार व फुलें त्यांच्याहातीं देण्यासाठीं ते स्टेशनवर गेले असतां व बरोबर अंगावरील कपड्याशिवाय कांहींएक घेतलें नसतांही त्यांना शिरडीस जावेसें वाटलें व ते तसेच निघाले व व तेथें एकवीस दिवस राहिले. शिरडीस गेल्यानंतर बाबा आपली वाट पहात होते असें त्यांना आढळून आलें ! बुटी-साहेबांच्या वाड्याजवळ ते उभे असतां वरून एक मोठा दगड घरंगळत येऊन तो वामन-रावांच्या डोक्यावर आदळला. ते कांहीं काळ बेशुद्धावस्थेंत पडून होते. बाबांना हें समजतांच डोक्यास लावण्यासाठीं त्यांनीं औषध पाठवून दिलें. त्यांना थोड्याच वेळानें शुद्धि आली. जखम बिखम कांहीं झाली नव्हती. परंतु तेथें असलेल्या काळांत ते एकप्रकारच्या दैवी गुंगींत होते.

त्यानंतर ३।४ वर्षेंपर्यंत वामनराव हे अहमदाबाद येथील मॉडेल हायस्कूलचे प्राचार्य ( प्रिन्सिपॉल ) होते. १९२१ सालीं पुन्हां मुंबईंत येऊन मेसर्स कांगा आणि सयानी या कंपनींत मॅनेजिंग क्लार्क म्हणून राहिले. नोकरींतील स्थित्यंतरें बढत्या वगैरे चालू होत्या. जीवनसंग्राम यशस्वी रीतीनें चालू रहावा यासाठीं नोकरी व्यवसाय चालू असला तरी वामनरावांचें सारें लक्ष लागून राहिलें होतें शिरडीकडे. १९११ ते १९१८ या काळांत त्यांना बाबांचा प्रत्यक्ष सहवास घडला व तो अमूप तसाच मुफलीदायी स्वरूपांत घडला. त्या सहवासाचा जितका म्हणून फायदा करून घेतां येईल तेवढा त्यांनीं करून घेतला.

## वामनरावांची वाङ्मयसेवा

आपल्या गुर्जरबंधूना श्रीसाईबाबांचा शक्य तेवढा जास्तींत जास्त परिचय व्हावा या स्तुत्य उद्देशानें त्यांनीं 'श्रीसाईबाबा' हा सुमारें चारशें पानांचा ग्रंथ १९४६ सालीं प्रसिद्ध केला. तो इतका लोकप्रिय झाला कीं आजवर त्याच्या सहा आवृत्या प्रसिद्ध झाल्या आहेत. शिक्षण क्षेत्रांतही त्यांनीं महत्वाचें कार्य पार पाडिले आहे. जनतेला अध्यात्म व धर्मसंबंधीं शक्य तेवढें ज्ञान व्हावें व जनतेच्या अभिरुचीला चांगलें वळण लागावें या हेतूनें गेल्या सुमारें १५।१६ वर्षांच्या काळांत त्यांनीं लहान मोठीं असंख्य पुस्तकें लिहिलीं. अहमदाबाद येथील 'सस्तु साहित्यवर्धक' प्रकाशन संस्थेनें त्यांचीं भगवत्‌गीता, श्रीशंक-राचार्य, मनुष्यधर्म, सती सावित्री, श्रीप्रल्हाद, अंबरिष, शुकदेव, गजेंद्रमोक्ष,

संत ज्ञानदेव, धर्मकथा, चांगदेव पासष्टी, नित्यपाठ, जपनाम स्मरण वगैरे अनेक पुस्तकें प्रकाशांत आणिलीं आहेत. त्याशिवाय श्रीरामकृष्ण परमहंस वचनामृत, उपासनी चरित्र, उपासनी महाराजांचीं प्रवचनें, परमेश्वर प्राप्ति, श्रीनु ऐश्वर्य, सिद्धांतमाला, वगैरे पुस्तकें प्रसिद्ध करून गुजराथी वाङ्मयाचें धार्मिक व अध्यात्मिक विषयांचें दालन आजवर शोभविलें व समृद्ध केलें आहे.

१९२३ सालीं सॉलिसीटरची परीक्षा उत्तीर्ण होऊन तो व्यवसायही त्यांनीं कांहीं काळ चालविला. कांहीं काळ अहमदाबाद येथील लॉ कॉलेजमध्यें ते कायद्याचे प्राध्यापकही होते.

## जनसेवेचें कार्य

वामनरावजींची साठी उलटून गेलेली होती. नाना व्यवसाय करीत असतांही त्यांची साईभक्ति उत्तरोत्तर वृद्धिंगत होत चालली होती. ज्या ज्या परीनें जनतेची सेवा करतां येईल त्या त्या परीनें ती करण्यासाठीं ते झटत होते.

श्रीसाईबाबांचा निस्सीम भक्त दुसरें काय करणार? जनसेवा परोपरीनें करतां येते. वामनरावजींना ज्या ज्या परीनें जनसेवेचें कार्य करतां आलें त्या त्या परीनें ते करण्यांत त्यांनीं केव्हांही कसूर केली नाहीं. ईश्वरानें त्यांना कांहीं कमी केलें, नव्हतें. बुद्धिमता, संपदा, मोठा हुद्दा, मानमान्यता सर्व कांहीं त्यांच्या हाताशीं होतें. परंतु सारें लक्ष लागून राहिलें होतें आपल्या गुरुमाऊलीकडे.

## सन्यास धर्माची दीक्षा

त्यानंतर १९५३ सालीं सर्वस्वी साईसेवेंत व लोकसेवेंत रहातां यावें या हेतूनें त्यांनीं संन्यास धर्मांची दीक्षा घेतली. भगवीं वस्त्रें धारण केली व त्या वस्त्रांना सुंदर शोभा येईल अशा रीतीनें ते वागूं लागले.

अहमदाबाद हें त्यांच्या सेवेचें मुख्य केंद्र आहे. तेथें समान धर्मा असे सहकारीही त्यांना लाभले आहेत. मद्रासला सुप्रसिद्ध साईभक्त बॅ. नरसिंहस्वामी हे सुदैवानें लाभले त्याचप्रमाणें गुजरातला श्री. वामनराव पटेल सॉलिसीटर आणि आतां संन्यास घेतल्यापासून नामांतर पावलेले श्रीसाई शरणानंद हे लाभले आहेत.

शिरडी येथें रहाण्यासाठीं त्यांनीं अलिकडेच आपलें हक्काचें स्थान करून ठेविलें आहे. गेल्या ऑक्टोबरमध्यें बाबांच्या पुण्यतिथीप्रसंगीं त्यांची भेट झाली व अल्पशा सहवासाचाही लाभ झाल्यामुळें फार आनंद झाला.

श्रीसाई शरणानंद हे श्रीसाईबाबांच्या कल्याणप्रद भक्तीभावाचा प्रचार गेल्या अनेक वर्षांपासून करीत आहेत. त्यांचें सारें जीवन साईमय झालेलें आहे. त्यांच्या वयास सुमारें ७२ वर्षे झालीं असलीं तरी त्यांचें वाचन, मनन, संशोधन अजूनही पूर्ववत् चालू आहे. ऐन तारुण्यांत जो बाबांच्या भक्तीचा मार्ग त्यांनीं स्वीकारला त्याच मार्गानें ते जात आहेत. अनेकांचें त्यांच्यामुळें मार्गदर्शन होत आहे. अनेकांस स्फूर्ति मिळत आहे. तशीच ती बाबांच्या कृपेनें दीर्घकाळपर्यंत मिळत राहो हीच प्रार्थना.

———

# श्रीसाईनाथ वाचनालय

**या वाचनालयास श्रीसाईबाबा संस्थानचे अधिकारी व नोकरवर्ग यांनीं वर्गणी गोळा करून २५ दिवाळी अंक भेट दिले. त्यांची नांवें :—**

| अं. नं. | नांवें |
|---|---|
| १. | श्री. जी. व्ही. क्षीरसागर साहेब |
| २. | ,, जी. एस्. कोटस्थाने साहेब |
| ३. | ,, डॉ. सुभाष डी. गुजराथी |
| ४. | ,, विनायकराव बी. घाटे |
| ५. | ,, एस. आर. गंधे |
| ६. | ,, एस. यू. दिवटे |
| ७. | ,, एस. एन्. डफेदार. |
| ८. | ,, सी. एस. महाजन |
| ९. | ,, अवधुतराव आर. शिंदे |
| १०. | ,, एस. ई. जोगस |
| ११. | ,, एन. आर. पवार |
| १२. | ,, जे. बी. बाकलीवाल |
| १३. | ,, एस. आर. जगताप |
| १४. | श्री. विठ्ठलराव वि. बागवे |
| १५. | ,, रूपचंद एस. जानेराव |
| १६. | ,, बी. पी. गायकवाड |
| १७. | ,, बी. आर. जाधव |
| १८. | ,, दिगंबर ल. जाखडी |
| १९. | ,, प्रभाकर एस. नागपूरे |
| २०. | ,, कोंडाजी व्ही. शेळके |
| २१. | ,, एकनाथ चं. कोते |
| २२. | ,, आर. के. परदेशी |
| २३. | ,, वामन केशव ओगले |
| २४. | ,, तुकाराम खु. परदेशी |
| २५. | ,, शाम आर. मिराणे |

## भेटीदाखल मिळालेले दिवाळी अंक

| अं. नं. | अंकाचें नांव | अंक देणाऱ्याचें नांव | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | रत्नदीप | सौ. नलिनी मुळगांवकर | मुंबई |
| २ | अजिंठा | श्री. द. शं. पोतनीस | औरंगाबाद |
| ३ | पुढारी | ,, ग. गो. जाधव | कोल्हापूर |
| ४ | नवा मराठा | ,, आचार्य गुंदेचा | अहमदनगर |
| ५ | जनसत्ता | ,, आण्णासाहेब पांडुरंग शिंदे | श्रीरामपुर |
| ६ | अंजली | ,, धनराज तोडरवाळ | शिर्डी |
| ७ | साहित्यलक्ष्मी | ,, फुलचंद गंगवाल | ,, |
| ८ | किर्लोस्कर | ,, गोपीनाथ कोते | ,, |
| ९ | श्रीयुत | ,, डांगे पोस्टमास्तर | ,, |
| १० | वसुधा | ,, टिबकर असि. पोस्टमास्तर | ,, |

---




## ऑक्टोबर १९६१

**या** महिन्यांत बाहेरगांवचे भक्त कमी अधिक प्रमाणांत येऊन दर्शन घेऊन . काहीं कलाकारांनीं हजेरी दिली ती खालील प्रमाणें—

**कीर्तनः**—कुमार श्रीराम श्रीपाद देव, ठाणें. श्री. श्रीपाद बाळकृष्ण वकील ठाणें. श्री. भैरव अनंत काळे, घोडगांवकणे. श्री. मराठे सं. गवई. डॉ. के. गव्हाणकर, मुंबई.

**प्रवचनः**—श्री. जठार मुंबई. श्री. शांताराम आत्माराम, जयवंत, मु. भिव जि. ठाणें.

**नृत्य व नाट्यः**—कु. निलांबरी मुंगी, दादर, मुंबई, कु. विभावरी शिंदे नासिक, कु. जयश्री पंडित, दादर, कुमार अजित क्षीरसागर.

**पोवाडेः**—श्रीसाईनाथ मेळा, कामशेट, ता. मावळ, जि. पुणें. श्री. गण श्रीपाद दाभाडे.

**नकला :** श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर पुणें, सौ. नीलाबाई वि. प्रभु मुं

**गायन :** श्री. सौ. चारुताई गुजराथी शिर्डी, श्री. कमलम्मा श्री. दत्तात्रय केशव कर्णिक, श्री. शनबा तात्या वाडेकर श्रीरामपूर, श्री. र. नवले मुंबई, श्री. सत्यवान माने मुंबई.

**कोजागरी :** कोजागिरीचे दिवशीं रात्रौ श्री. डॉ. गव्हाणकर मुंबई यां कीर्तन श्रींचे समाधीस अभिषेक तुलसीअर्चन पूजा, चंद्रपूजा ( पोहे-दूध-प्रसाद रात्रौ जागर वगैरे झाला.

शिर्डी येथील हवापाणी चांगलें आहे.



# श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | किंमत रु. न.पै. |
|---|---|
| (१) श्रीसाईसच्चरित (मराठी) | ७·०० |
| (२) श्रीसाईसच्चरित (हिंदी) | ४·५० |
| (३) श्रीसाईसच्चरित (इंग्रजी) | ४·०० |
| (४) श्रीसाईसच्चरित (गुजराथी) | ३·७५ |
| (५) श्रीसाईसच्चरित (कानडी) | ३·०० |
| (६) श्रीसाईनाथ-स्तवनमंजरी | ०·१२ |
| (७) दासगणूकृत (४ अध्याय) | ०·५० |
| (८) सगुणोपासना | ०·२५ |
| (९) प्रधानकृत साईबाबा शिर्डी (इंग्रजी) | १·०० |
| (१०) श्रीसाईलीलामृत | २·०० |
| (११) श्रीसाईसुमनांजलि | ०·०६ |
| (१२) कीर्तनपंचक | १·५० |
| (१३) शीलधी | ०·७५ |
| (१४) साईबाबा अवतार व कार्य | २·०० |
| (१५) श्रीसाईगीतांजली | ०·१२ |
| (१६) रुद्राध्याय (११ वा) | ०·१२ |

(पोस्टेज निराळें)

वरील पुस्तकांकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

१. सरकारकून, श्रीसाईबाबा **संस्थान,** पोष्ट-शिरडी, जि. अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.